# मेहता मराठी ग्रंथजगत


मे, २०२१

पृष्ठे ६८ किंमत : रु.१५

वर्ष एकविसावे

अंक पाचवा
















दरवर्षी होणारे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यावर्षी कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे पुढे ढकलण्यात आले. अशा परिस्थितीत साहित्य क्षेत्रात थोडीशी नाराजी पसरलेली असताना मराठी साहित्य आणि सांस्कृतिक चळवळीचे अग्रगण्य डिजिटल मुखपत्र असलेल्या 'मराठी साहित्य वार्ता' यांनी 'पहिले डिजिटल मराठी साहित्य संमेलन' आयोजित करून संमेलनाला एक वेगळं व्यासपीठ उपलब्ध करून दिलं,हे अतिशय कौतुकास्पद आहे.

१ मे महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिनाचे औचित्य साधून, आयोजित केले गेलेले हे एकदिवसीय डिजिटल साहित्य संमेलन अनेक साहित्यिकांच्या हजेरीत उत्साहात पार पडले. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी मुंबईचे ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत अर्जुन डांगळे, उद्घाटक प्रसिद्ध कवी आणि साहित्यिक निलेश पंडित, स्वागताध्यक्ष अकोल्याचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा. डॉ. संतोष हुशे इत्यादी मान्यवरांसोबतच प्रमुख पाहुणे म्हणून मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक श्री. सुनील मेहतासुद्धा उपस्थित होते.

डिजिटल माध्यमे आणि पुस्तके याविषयी आपलं मत व्यक्त करताना सुनील मेहता यांनी छापील पुस्तकांसोबतच डिजिटल माध्यमे किंवा इबुक्स ही काळजी गरज असून त्यांची स्वतंत्र वैशिष्ट्ये आहेत असे सांगितले. यातलेही अनेक फायदे आणि तोटे लक्षात घेता पीडीएफ स्वरूपातील पुस्तकांचं वाढतं वितरण फारच निराशाजनक असल्याचं मत व्यक्त केलं. अशावेळी साहित्य क्षेत्राला हातभार लावण्यासाठी डिजिटल माध्यमांचा सकारात्मक वापर करून अनेक नवीन पायंडे पाडले जातात, जे वाचकांनाच नाही, तर लेखकांना आणि प्रकाशकांनाही प्रेरणादायी ठरतात.असे सांगून असाच एखादा प्रयत्न मराठीतील पुस्तके इतर भाषांमध्ये भाषांतरित व्हावी, यासाठीही राबवता यावा,असे मत व्यक्त केले, जेणेकरून जगभरातील लेखक प्रकाशकांच्या मेळाव्याचे आयोजन करून आपली पुस्तके इतर भाषांमध्ये पोहचवणे शक्य होईल. कोरोनामुळे सर्वत्र नैराश्य वाढत असताना डिजिटल साहित्य संमेलनांसारखे उपक्रम नक्कीच जनमानसात सकारात्मकता वाढवायला मदत करतात असे सांगून आयोजकांचे अभिनंदन केले.

विविध चर्चासत्रे, कवीसंमेलने इत्यादी कार्यक्रमांमुळे हे पहिले मराठी डिजिटल साहित्य संमेलन म्हणजे प्रत्येक साहित्य रसिकांसाठी घरबसल्या मिळणारी एक विशेष पर्वणीच होती.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ मे २०२१ ◆ वर्ष एकविसावे ◆ अंक पाचवा

**संपादक**

सुनील मेहता

**संस्थापक संपादक**

शंकर सारडा

**अंकाची किंमत १५ रु.**

वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**

दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*


## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **श्रद्धांजली** | **१०** |
| **विशेष** | **१४** |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| अशी जिरवली सरदारांची आणि इतर कथा | १६ |
| अकबराचा जप आणि इतर कथा | २६ |
| चिलखताची पारख आणि इतर कथा | ३४ |
| दयाळू बिरबल आणि इतर कथा | ४२ |
| **अभिप्राय** | **५०** |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.



## कोरोनाच्या विळख्यातून निसटूया..

कोरोनाच्या पहिल्या धक्क्यातून देश सावरत असतानाच पुन्हा एकदा सगळीकडे कोविडचं भयानक सावट पसरलंय. 'लॉकडाऊन-२'च्या घोषणेने सर्वसामान्य माणसाच्या जगण्याची घडी पुन्हा एकदा विस्कटलीय. महाराष्ट्रासहित देशांतील अनेक राज्यांत सध्या कोविडने इतका हाहाकार माजवलाय की, देश मोठ्या संकटात अडकलाय. रोज वाढणाऱ्या रुग्णांचा आकडा, हॉस्पिटलमध्ये बेडची कमतरता, ऑक्सिजनची वाढती गरज, व्हेंटिलेटर मिळवण्यासाठी रुग्णांच्या नातेवाइकांची होणारी धावाधाव यामुळे आपली आरोग्यव्यवस्था पार कोलमडून गेलीय. प्रत्येकजण जीव मुठीत धरून केवळ जगण्याचा आटापिटा करताना दिसतोय.

गेल्या वर्षी भारतात आलेल्या कोविडच्या पहिल्या लाटेपेक्षा ही दुसरी लाट अत्यंत भयावह आहे. दररोज वाढणाऱ्या मृतांचा आकडा थरकाप उडवणारा, तर वैद्यकीय सुविधेवाचून तडफडणाऱ्या रुग्णांची अवस्था खूपच दयनीय आणि चिंताग्रस्त आहे.

ऐन उन्हाळ्यात उद्भवलेल्या या कोविड संकटाने या वेळी तरुण वर्गाला विळखा घातलाय. कित्येक घरातली तरुण मुलं व्हेंटिलेटरवर असल्याच्या बातम्या ऐकून थरकाप उडत आहे. नाशिक येथील हॉस्पिटलच्या आवारात झालेली ऑक्सिजन सिलेंडरची गळती

असो किंवा विरारमधील हॉस्पिटलच्या आयसीयू कक्षात झालेला एसीचा स्फोट असो, या दोन्ही दुर्घटना अगदी हृदय पिळवटून टाकणाऱ्या आहेत. यात मृत्युमुखी पडलेल्या सर्व रुग्णांना मनापासून श्रद्धांजली!

एकीकडे ऑक्सिजनच्या तुटवड्यामुळे प्राण गमावल्याच्या अनेक बातम्या कानावर येत असताना दुसरीकडे गेली कित्येक वर्षं आपले शत्रूराष्ट्र म्हणून परिचित असलेल्या पाकिस्तानकडून भारताला संकटकाळात मदत करण्याची, ऑक्सिजनचा पुरवठा करण्याची भावना व्यक्त केली जाते, हे चित्र अतिशय आशादायी आहे. सध्या 'पाकिस्तान स्टॅन्ड्स विथ इंडिया!' हा नारा सोशल मीडियावर खूपच ट्रेन्ड होताना दिसत आहे. यावरून इतकंच कळतंय की, कुणालाही मदत करताना कुठलाही 'मजहब' आड येत नाही आणि याचा प्रत्यय आपण सगळेच या काळात घेत आहोत.

आजूबाजूला इतकं अस्थिर वातावरण असतानाही आशेचे दीप होऊन अनेक योद्धे आपल्या जिवाची बाजी लावून काम करताना दिसत आहेत. ज्यात आपले पोलीस मित्र, वैद्यकीय क्षेत्रातले सर्व बांधव, सफाई कामगार आणि अनेक ज्ञात-अज्ञात सामाजिक कार्यकर्ते जे रुग्णांना हवी ती मदत मिळवून देण्यासाठी दिवस-रात्र धावपळ करताना दिसत आहेत, या सर्वांच्या धैर्याला आणि जिद्दीला पुन्हा एकदा सलाम करूयात! त्यांच्यामुळेच या कठीण परिस्थितीशी सामना करण्याचं बळ आपल्याला मिळत राहतं. जगण्याची उमेद वाढत राहते. सुरुवातीला वाढतच जाणाऱ्या रुग्णवाढीचा वेगदेखील आता कमी होऊन बऱ्या होणाऱ्या रुग्णसंख्येत दिवसेन्दिवस होत जाणारी वाढहीदेखील मोठी समाधानकारक आणि सकारात्मक बाजू आहे.

हा काळ जितका कठीण तितकाच अनेकांसाठी जीवघेणा ठरत आहे. अनेक कुटुंबांनी आपली जवळची, जिवाभावाची माणसं गमावली. या आजारात अनेक अभ्यासू व्यक्तिमत्त्वं, विचारवंत, लेखक आणि अनेक कलाकारही आपल्याला कायमचे सोडून गेले. ज्यामध्ये प्रसिद्ध हिंदी साहित्यिक नरेंद्र कोहली, चित्रपट अभिनेत्या शशिकला, संगीतकार श्रवण राठोड, पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित असलेले भारतीय शास्त्रीय गायक पंडित राजन मिश्रा, प्रसिद्ध हिंदी लेखक मंजूर एहतेशाम, राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या सुप्रसिद्ध मराठी दिग्दर्शिका सुमित्रा भावे, कन्नड-मराठी साहित्य क्षेत्रातील उत्तम अनुवादक म्हणून परिचित असलेले विरूपाक्ष कुलकर्णी आणि सुप्रसिद्ध मराठी लेखिका शकुन्तला फडणीस यांचा समावेश होता. यांच्या निधनाने विविध क्षेत्रांची मोठी हानी झाली असून, ही पोकळी कधीही भरून निघणार नाही.

या परिस्थितीचा अनेक व्यवसाय, उद्योगांसोबत पुस्तकविक्री आणि प्रकाशन क्षेत्रावरही मोठ्या प्रमाणावर परिणाम होतोय. पुन्हा एकदा टाळेबंदी आणि सरकारी निर्बंधांमुळे पुस्तकविक्री आणि खरेदीमध्ये खंड पडला आहे. अशा परिस्थितीतही आपण आपला वाचनवसा सुरू ठेवला असेलच, याची खात्री आहे. आजूबाजूच्या क्लेशदायक आणि नैराश्याच्या वातावरणात उत्तम पुस्तकांच्या सहवासात राहून आपण आपल्या मनावर येणारा ताण कमी करू शकतो. सकारात्मक विचारांनी या परिस्थितीशी धैर्याने लढू शकतो. हा कठीण काळ लवकरच सरेलआणि पुन्हा एकदा नव्या पुस्तकांची वाचकांशी भेट होईलअशी आशा करूया.

एकंदरीत देशाची अवस्था बघता प्रशासनाला सर्वतोपरी सहकार्य करणे हे केवळ कर्तव्य नसून, ती आता आपली जबाबदारी आहे, हे आपण लक्षात घेऊया. कोरोनाची साखळी तोडण्यासाठी चेहऱ्यावर सतत मास्कचा वापर करणं, संसर्ग होऊ नये म्हणून सामाजिक संपर्क टाळणं, कोविडची कुठलीही लक्षणं आपल्यामध्ये दिसताच वेळीच खबरदारी घेणं या गोष्टींकडे गांभीर्याने लक्ष देऊया. स्वतःची आणि आपल्या कुटुबीयांची काळजी घेऊया. सध्या देशभर अनेक रुग्णांना रक्ताचा तुटवडा भासत आहे, त्यासाठी आपण पुढे येऊन रक्तदान करू शकतो आणि एखाद्या व्यक्तीला नक्कीच जीवनदान देऊ शकतो. आपल्याला कोरोना होऊन गेला असल्यास गरजू रुग्णाला प्लाझ्मा दान करू शकतो. या संकटकाळात जर आपण मदतीसाठी उभे राहिलो, तर लवकरच या महामारीतून आपली सुटका होईलआणि आपण पूर्वीप्रमाणे पुन्हा एकदा मास्कच्या पडद्याशिवाय जनमानसात मिसळू. तो दिवस लवकरच आपल्याला पाहायला मिळो, यासाठी प्रयत्नशील राहूया. तोवर सकारात्मक विचारांसोबत उत्तम पुस्तके वाचत राहूया आणि स्वतःला वाचवत राहूया.

आशा करूया की, हे कोरोनाचं मळभ दूर होऊन लवकरच सर्वांना मोकळ्या वातावरणात श्वास घेता येईल.

माना ख़राब वक़्त है, हालात हैं बुरे
इतना भी पर नहीं कि हम उम्मीद छोड़ दें

- अनुज अब्र

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

**आमच्या छापील अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

**डिजिटल अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

***Available on***

play.google.com / store / books

www.amazon.in

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

# मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

## टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक - G Pay +91 94223 23039

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी,
सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ.
विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

amazon — GET IT ON Google Play — Get it on Apple Books

यांच्या संयुक्त विद्यमाने
नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**

**www.amazon.in**

**play.google.com**

**https://books.apple.com**





**Online** पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

## ज्येष्ठ अनुवादक हरपला..!

अभिजात मराठीतील समृद्ध साहित्य अनुवादाच्या माध्यमातून कन्नड भाषिकांपर्यंत पोचवणाऱ्या विरूपाक्ष कुलकर्णी यांचे १६ एप्रिल रोजी वयाच्या ८१व्या वर्षी कोरोनामुळे निधन झाले.

केवळ प्रसिद्ध अनुवादक इतकीच त्यांची ओळख नसून, उमा कुलकर्णी यांचे पती अशी त्यांची खास ओळखही साहित्य विश्वाला होती. एक उत्तम अनुवादक म्हणून उमा कुलकर्णी या 'मेहता पब्लिशिंग हाऊस' सोबत बऱ्याच वर्षांपासून जोडल्या गेल्या आहेत. महान कन्नड लेखक एस. एल. भैरप्पा, यू. आर. अनंतमूर्ती, के. पी. पूर्णचंद्र तेजस्वी, डॉ. शिवराम कारंथ यांची सुमारे ५५ पुस्तके डॉ. उमा कुलकर्णी यांनी मराठी भाषिकांसाठी अनुवादित केली आहेत. तर त्यांचे पती विरूपाक्ष कुलकर्णी यांनी प्रामुख्याने वि. दा. सावरकर यांचे 'माझी जन्मठेप', सुनीता देशपांडे यांचे 'आहे मनोहर तरी', 'भैरप्पा-कारंथ लेखन समीक्षा', विश्वनाथ खैरे यांचे 'मिथ्यांचा मागोवा' ही पुस्तके कन्नड भाषेत अनुवादित केली आहेत. पु. ल. देशपांडे यांच्या 'व्यक्ती आणि वाङ्मय' या पुस्तकाचे संपादनही त्यांनी केले आहे.

संरक्षण खात्याच्या हाय एक्सप्लोजिव्ह कारखान्यात इलेक्ट्रिकल इंजिनिअर म्हणून



काम करताना विरूपाक्ष यांनी एकीकडे आपली साहित्याची आवडही जोपासली. कर्नाटकातून पुण्यात आल्यानंतर कुलकर्णी दांपत्याने अनुवादाच्या क्षेत्रात पाऊल टाकत कन्नड-मराठी भाषांमधील साहित्याच्या चौकटी अधिक मोठ्या केल्या. गेली चार दशके दोन्ही भाषांत अविरतपणे सुरू असणारी ही साहित्यिक देवाण-घेवाण विरूपाक्ष कुलकर्णी यांच्या अचानक झालेल्या निधनाने आता थांबणार, हे अतिशय वेदनादायी आहे. मितभाषी आणि मृदू स्वभाव असलेल्या विरूपाक्ष यांनी आपल्या पत्नीच्या खंबीर साथीने, संपूर्ण आयुष्य लेखनासाठी वाहून घेतले होते. मराठी साहित्यिकांच्या साहित्यकृती कन्नड भाषिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी घेतलेला ध्यास विलक्षण होता. त्यांच्या जाण्याने कन्नड-मराठी साहित्य क्षेत्राचे मोठे नुकसान झाले आहे.

त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, हीच प्रार्थना. मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मेहता बुकसेलर्स यांच्यातर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली!

## बालसाहित्य लेखनातला महत्त्वाचा तारा निखळला

मराठी बालसाहित्याला नवा आयाम देणाऱ्या शकुन्तला फडणीस यांचे दिनांक १६ एप्रिल रोजी वयाच्या ९०व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. शकुन्तला फडणीस या पूर्वाश्रमीच्या शकुन्तला बापट. पुण्याच्या सांस्कृतिक विश्वातली एक सृजनशील जोडी म्हणून चित्रकार शि. द. फडणीस आणि शकुन्तला फडणीस सर्वांना परिचित आहेतच; त्यापैकी एक तारा निखळला.

मेहता पब्लिशिंग हाऊस सोबत गेली अनेक वर्षे लेखनसेवा बजावणाऱ्या शकुन्तला फडणीस यांनी आपला मोठा वाचकवर्ग निर्माण केला होता.



एकीकडे अविरत चालणारी लेखणी तर दुसरीकडे अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेची जबाबदारी समर्थपणे सांभाळणाऱ्या फडणीस त्या संस्थेच्या आधारवड होत्या. उत्तम विनोदी कथालेखन, बालसाहित्य लेखन, व्यंगचित्रकलेवर आस्वादक लेखन, यांसह कथाकथन कार्यक्रम, रेडिओवरील श्रुतिका आणि भाषणलेखन अशा अनेक गोष्टींत त्यांनी एक विशेष स्थान निर्माण केले होते. राज्य शासनाचा उत्कृष्ट बालसाहित्य पुरस्कार तीन वेळा, पुणे महानगरपालिका, बापट कुलमंडळ, यशवंत वेणू पुरस्कार, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ, राणी लक्ष्मी मंडळ यांसह अनेक खासगी संस्थांचे पुरस्कार त्यांना मिळाले होते. शकुन्तला फडणीस यांची ३०हून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या जाण्याने मराठी साहित्य वर्तुळात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. लेखनाच्या माध्यमातून मागे राहिलेल्या त्यांच्या स्मृती वाचकांच्या मनात कायम रुंजी घालत राहतील यात शंका नाही.


त्यांच्या आत्म्यास शांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना! मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मेहता बुकसेलर्स यांच्यातर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली!

बालचमूंसाठी चतुर आणि विनोदी तेनालीरामच्या
धमाल गोष्टींचा खजिना


# तेनालीराम मालिका

लेखिका - मंजूषा आमडेकर


**बुद्धिमान तेनालीराम । हुशार तेनालीराम**
**निर्भय तेनालीराम । परोपकारी तेनालीराम**
**विनोदवीर तेनालीराम**












५ पुस्तकांच्या एकत्रित संचाची किंमत ₹ ९२०

## फक्त पाच रुपयांत घरपोच पुस्तके

महिलांना वाचनाची गोडी
लावण्यासाठी
राधामणींची मोहीम


घराघरांत जाऊन पुस्तके देणाऱ्या ६४ वर्षांच्या के. पी. राधामणी या केरळमधील ‘चालतीफिरती लायब्ररिअन’ म्हणून ओळखल्या जातात. या वयातही राधामणी यांचा उत्साह जराही कमी नाही. वायनाड आणि आसपासच्या भागांमध्ये अवघ्या पाच रुपयांत त्या घरपोच पुस्तकांची सेवा देतात. घरातील कामांमध्ये अडकून पडलेल्या महिलांनी वेळात वेळ काढून वाचन करावं हा त्यांचा हेतू आहे.

२०१२ पासून राधामणी बॅगेत पुस्तके ठेवून फिरतात; मात्र सध्या कोरोनामुळे त्यांच्या कामात खंड पडलाय. केरळ राज्यातील शिक्षण मंडळाने महिलांच्या शिक्षणासाठी सुरू केलेल्या अभियानासाठी त्या काम करतात. मूळच्या कोट्टमच्या राधामणी १९७९ पासून वायनाड येथे राहतात. त्या सांगतात, ‘मी दररोज २० ते २५ पुस्तके बॅगेत घेऊन निघते. त्यामध्ये



कादंबऱ्या, स्पर्धा परीक्षांची पुस्तके आणि बालसाहित्य असते. जवळच्या ग्रंथालयातून मला ही पुस्तके मिळतात. खरं तर दर महिन्याला पाच रुपये किंवा वार्षिक पंचवीस रुपये वर्गणी देऊन कुणीही ग्रंथालयाचे सदस्य होऊ शकते; मात्र जे लोक ग्रंथालयात जाऊ शकत नाहीत त्यांना मी घरपोच पुस्तके देते.

राधा या स्वत: दहावीपर्यंत शिकलेल्या आहेत. त्यांना पुस्तक वाचनाची खूप आवड आहे. महिलांना घरपोच पुस्तके देण्यात मला आनंद वाटतो. खूप जणी स्पर्धा परीक्षांची पुस्तके वाचतात आणि यशस्वी होतात, हेच माझं मोठं समाधान आहे, असे राधा सांगतात.




# अशी जिरवली सरदारांची
## आणि इतर कथा

■

लेखक
**मंजूषा आमडेकर**

# अशी जिरवली सरदारांची

बिरबल दरबारात आल्यापासूनच त्याला विनाकारणच अनेक शत्रू निर्माण झालेले होते. कारण बिरबलानं आपल्या चातुर्यानं आणि इतर अनेक गुणांना बादशहाचं मन जिंकून घेतलेलं होतं. बादशहाची त्याच्यावर विशेष मर्जी आहे हे पाहून इतर सरदारांचा जळफळाट होत असे. त्या सगळ्यांनाच असं वाटायचं,

'आमच्याकडेही अक्कलहुशारी आहेच की! बादशहा त्या बिरबलाला का उगाचच इतकं महत्त्व देतो?' बादशहाला ते आडून आडून तसं सुचवूनही पाहायचे. बादशहाला काही ते कळत नव्हतं असं नक्कीच नव्हतं; पण तो तिकडे दुर्लक्ष करायचा.

तरीही सरदार बिरबलाविरुद्ध काही ना काहीतरी कट-कारस्थान करत राहायचे. एकदा मात्र त्यानं ठरवलं की या सरदारांची खोडच जिरवली पाहिजे चांगली.

तो बिरबलाला म्हणाला, ''तुला पाण्यात बघणाऱ्या या सरदारांची खोड मोडूया रे जरा. फार त्रास देत असतात. सरकारी कामातही अडथळे आणायला मागे-पुढे पाहत नाहीत.'' बिरबल हसला आणि म्हणाला, ''त्यात काही फारसं अवघड नाही खाविंद. असं करूया, मी एक-दोन दिवस दरबारात येतच नाही. तुम्ही त्या सगळ्यांना संधी द्या. तुम्ही रोज काही ना काही प्रश्न मला विचारत असता, तसे त्यांनाही विचारा. मी खात्रीनं सांगतो, की त्यांची उत्तरं त्यांना येणार नाहीत. मग तुम्ही त्यांना सांगा, की उत्तरं आली नाहीत तर जबर शिक्षा करेन, मग येतीलच ते माझ्याकडे धावत. मग बघू आपण मजा.''

बादशहाला हा बेत एकदम पसंत पडला. त्यानुसार बिरबलानं दोन दिवस दरबाराला दांडी मारली. त्या दोन दिवसांच्या सुरुवातीला सरदार इतके खुश होते की काही विचारू नका. प्रत्येकाला वाटत होतं की आपणच आज बाजी मारून नेणार. बादशहाला खुश करणार. इतकं की बादशहाला बिरबलाची आठवणही होता कामा नये. प्रत्येकजण बादशहाच्या पुढे पुढे करण्याचा प्रयत्न करत होता.

बादशहा खरं तर अगदी कंटाळून गेला होता. रोजच्या कामकाजात बादशहानं सरदारांचा सल्ला घेतला; पण तो काही त्याला खास वाटला नाही.

मग त्यानं त्यांना एक प्रश्न विचारला, ''कोणती गोष्ट माणसाला सगळ्यात मोठी वाटते?''

एकेक सरदार उत्तरं द्यायला लागले. एकजण म्हणाला, ''त्यात काय सरकार? सर्वांत मोठी गोष्ट आपणच तर आहात, बादशहापेक्षा मोठं काय असू शकतं?''

बादशहा त्यांना खडसावून म्हणाला, ''हे पाहा, उगाच मला खुश करायला काहीतरी फालतू उत्तरं देऊ नका. जरा डोक्याचा वापर करून योग्य उत्तर द्या.''

सगळे सरदार बादशहाचा करडा स्वर ऐकताच चपापले.

मग दुसरा पुढे होऊन म्हणाला, ''सर्वांत मोठी गोष्ट आहे ईश्वर किंवा अल्ला.''

बादशहा म्हणाला, ''असं का? मग चुकीचं वागताना त्या ईश्वराची किंवा अल्लाची आठवण होते का? तरीपण चुका करताच ना? आता नीट उत्तर द्या, नाहीतर सगळ्यांना जबर शिक्षाच करतो.''

एक सरदार घाबरत घाबरत पुढे झाला आणि म्हणाला, ''सगळ्यात मोठी गोष्ट आहे सत्य.'' त्याला वाटलं की आपण असं काहीतरी तत्त्वज्ञान सांगितलं तर बादशहा आपल्याला शाबासकी देईल; पण बादशहा मुळीच प्रभावित झाला नाही. तो थंडपणे म्हणाला, ''आणि ते सत्य काय आहे?'' त्यावर त्या सरदाराला काय बोलावं तेच सुचेना.

बादशहा म्हणाला, ''रोजच्या आयुष्यात तुम्ही साध्या साध्या गोष्टीत



तरी सत्य बोलता का? सत्य म्हणजे काय ते जाणून घेणं फार लांबची गोष्ट आहे.''

आता मात्र कुणीच बोलायची हिंमत करेना. बादशहानं थोडा वेळ वाट पाहिली आणि म्हणाला, ''मी तुम्हाला एक दिवसाची मुदत देतो. तुम्ही मला उद्या माझ्या प्रश्नाचं समाधानकारक उत्तर दिलं नाहीत, तर तुम्हाला सगळ्यांना तुरुंगात डांबतो.''

आता मात्र सरदारांची धाबी दणाणली. सगळेजण चुपचाप घरी निघून गेले.

सगळ्यांनी खूप डोकी खाजवली; पण कुणालाही योग्य उत्तर सुचेना. सगळे एकत्र येऊन विचार करायला लागले. कुणालाच काही सुचत नाहीसं पाहून एका सरदारानं सुचवलं, ''आपण बिरबलाकडे जाऊया का? आता त्याच्याशिवाय कुणीच उत्तर देऊ शकणार नाही या प्रश्नाचं. नाहीतर उद्या बादशहा आपल्याला सगळ्यांनाच तुरुंगात टाकेल.'' आता खरं तर बिरबलाकडे गेलं पाहिजे हे सगळ्यांनाच पटत होतं; पण त्याच्याकडे जाण्यात कमीपणाही वाटत होता; पण दुसरा काही इलाजही नव्हता. तेव्हा हो-ना करता करता सगळ्यांनी तो प्रस्ताव मान्य केला आणि सगळेजण बिरबलाच्या घरी गेले.

बिरबल त्यांची वाटच पाहत होता. त्यानं मोठ्या साळसूदपणानं त्यांचं स्वागत केलं. म्हणाला, ''अरे वा, आज काय विशेष? आज माझी कशी काय आठवण झाली सगळ्यांना?''

सरदार म्हणाले, ''दोन दिवस तुम्ही दरबारात आला नाहीत, तर आम्हाला कुणालाच चैन पडेना, म्हणून म्हटलं, भेटून यावं, कसे आहात ते विचारायला.''

बिरबलाला मनातून खरं तर खूप हसू येत होतं; पण वर तसं न दाखवता तो म्हणाला, ''वा, वा, वा, मी फारच भाग्यवान आहे म्हणायचा. बरं झालं आलात, आता जरा पाहुणचार घ्या आमच्या घरचा.''

मग त्यानं नोकरांकरवी सरदारांना सरबत आणि फराळ दिला. बिरबल बराच वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा करत राहिला. शेवटी सगळेजण चुळबुळ करायला लागले. बिरबलाच्या ते लक्षात येत होतं; पण तो मुद्दामच दुर्लक्ष करत राहिला.

मग शेवटी त्यानं विचारलं, ''आपले बादशहा सलामत काय म्हणतात?'' सरदारांनी मनातल्या मनात 'हुश्श,' केलं. 'चला, निघाला

एकदाचा विषय.' मग एकजणानं धीर करून दरबारात घडलेली हकिकत सांगितली. त्यावर बिरबल म्हणाला, ''हात्तिच्या, एवढंच ना? मग तुम्ही दिलंत ना उत्तर? इतके हुशार आहात तुम्ही सगळे.''

त्यावर सरदारांची तोंडं पडली. दुसरा एकजण म्हणाला, ''नाही हो, आम्हाला कुणालाही उत्तर देता आलं नाही, म्हणून म्हटलं, तुमची काही मदत होऊ शकली तर...'' मग बिरबल उगीचच भाव खात म्हणाला, ''अं... मला जरा विचार करायला लागेल. आपण असं करूया, आज रात्रभर मी विचार करतो. तुम्ही सर्वजण उद्या सकाळी इथे या, मग आपण इथूनच दरबारात जाऊ.''

सरदार 'बरं,' म्हणाले खरे; पण सगळ्यांच्या छातीत धाकधुक होत होती. सगळेजण घरी निघून गेले. रात्रभर बिचारे झोपेविना तळमळत राहिले. सगळ्यांच्या पोटात एकच खड्डा पडलेला होता, 'जर बिरबलानं मुद्दामहून उत्तर नाही दिलं तर?' सगळं आयुष्य आपल्याला तुरुंगात खितपत पडावं लागेल या एकाच कल्पनेनं सगळ्यांना घाम फुटलेला होता. शेवटी सकाळ झाली. सगळेजण आवरून बिरबलाच्या घरी हजर झाले.

बिरबलही आवरून तयार होता. तो म्हणाला, ''मला उत्तर सुचलेलं आहे, पण...'' सरदारांना वाटलं, की हा आता काहीतरी पैसे वगैरे मागेल. सगळेजण एका सुरात म्हणाले, ''तुम्ही मागाल ते आम्ही द्यायला तयार आहोत; पण उत्तर सांगा कसंही करून.''

बिरबल म्हणाला, ''उत्तर मी आत्ता लगेच सांगणार नाही. दरबारात पोचल्यावरच सांगेन; पण माझी एक लहानशी अट आहे.''


सरदार म्हणाले, ''सांगा, सांगा. आम्हाला मान्य आहे.''

बिरबल म्हणाला, ''तुम्ही सर्वांनी दहीहंडी फोडताना रचतात तसा मनोरा रचायचा, मला सर्वांत वर बसवायचं आणि चालत दरबारात न्यायचं.''

सरदारांचे चेहरे खर्रकन उतरले; पण करतात काय? अडला हरी, गाढवाचे पाय धरी, अशी अवस्था झाली होती त्यांची. फरक एवढाच की इथे त्यांच्या पुढे गाढव नसून अत्यंत हुशार माणूस होता. त्यांनी ते नाईलाजानं मान्य केलं.

सगळ्यांनी मिळून एकमेकांच्या खांद्यावर चढून मनोरा रचला, सर्वांत वर बिरबलाला चढवलं आणि ही सगळी वरात निघाली दरबाराकडे.

आता खरं तर दरबारातले प्रतिष्ठित सरदार होते ते. त्यांना या अशा अवस्थेत पाहून लोक खदाखदा हसत होते. त्यांची मनं अपमानानं जळत



होती. पण, करतात काय? बिरबल म्हणेल तसं मुकाट्यानं करण्यातच त्यांचं हित होतं.

सरतेशेवटी सगळी मिरवणूक दरबारात जाऊन पोचली. तिथे बादशहानं हा सगळा प्रकार पाहताच तोही खो खो हसत सुटला. म्हणाला, ''अरे बिरबल, हा सगळा प्रकार तरी काय आहे? खाली उतर पाहू.''

बिरबल म्हणाला, ''सरकार, हे तुमच्या प्रश्नाचं उत्तर आहे.''

सगळे सरदार आणि बादशहा चकितच झाले. सरदार एकमेकांकडे थक्क होऊन पाहतच राहिले. म्हणाले, ''हे कसलं उत्तर?''

बिरबल हसत हसत म्हणाला, ''खाविंद, हे सगळे सरदार नेहमी मला पाण्यात बघत असतात. मला नावं ठेवत असतात; पण आज हे मला स्वत:च मानहानी पत्करून डोक्यावर बसवून इथे घेऊन यायला तयार झाले. याचं कारण आहे स्वार्थ! त्यांना तुरुंगवास टाळायचा होता आणि त्यासाठी ते स्वत:ची प्रतिष्ठा धुळीला मिळवून माझ्यासारख्या शत्रूचे पाय धरायलाही तयार झाले.

याचाच अर्थ असा झाला की 'स्वार्थ' ही जगातली सर्वांत मोठी गोष्ट आहे. खरं आहे की नाही सांगा.'' त्यावर सगळे सरदार लज्जित होऊन माना खाली घालून उभे राहिले.


बादशहा हसत हसत म्हणाला, ''पाहिलंत? याला म्हणतात उत्तर. बिनतोड उत्तर आहे हे. आणि आता तरी तुम्हाला कळलंच असेल की बिरबल माझा इतका लाडका का आहे ते!'' त्यावर कुणीच काही बोललं नाही.


# हत्तीवाला बादशहा

एकदा एका सणानिमित्त बादशहा दर्ग्यामध्ये पिराच्या दर्शनाला चाललेला होता. बादशहा मिरवणुकीतून चाललेला असल्यामुळे एका हत्तीवरच्या अंबारीत बसलेला होता. मोठ्या उत्साहात मिरवणूक वाजतगाजत चाललेली होती. चौकात गेल्यावर अचानक समोरून एक दारूडा माणूस झिंगत झिंगत आला.

तो इतका प्यायलेला होता की त्याला आसपास काय चाललंय, समोर कोण आहे, याची कल्पनाही नव्हती. तारवटलेल्या डोळ्यांनी इकडे-तिकडे पाहत असताना त्याला समोर अंबारीत बसलेला बादशहा दिसला. त्याबरोबर अतिशय मस्तवालपणानं तो बादशहाला म्हणाला, "अरे ए, हत्तीवाल्या, खाली उतर. मला बसू दे हत्तीवर. मी कोण आहे माहीत आहे का तुला? मी राजा आहे राजा, दिल्लीचा राजा. चल, मला तो विकत दे हत्ती. हे बघ, माझ्याकडे पैसे आहेत. केवढ्याला दिलास बोल हत्ती?" असं म्हणून त्यानं खिशातली चार-पाच नाणी खुळखुळ वाजवली. ते ऐकताच बादशहा अतिशय संतापला. त्यानं शिपायांना खूण केली.

शिपायांनी त्या दारूड्याला पकडलं आणि तुरुंगात डांबलं. सकाळी त्याला जाग आली. आता त्याची नशा साफ उतरलेली होती. आपण कुठे





आहोत तेच त्याला काही क्षण कळलं नाही. तो मोठ्यानं म्हणाला, ''अरे, मी कुठे आलो? काल तर मी दारूच्या दुकानात पीत बसलो होतो. सकाळ झाल्यावर आपोआपच कुठे आलो मी?''

त्याला शुद्ध आलेली पाहून तिथला रखवालदार त्याच्यावर खेकसला, ''ए दारूड्या, अरे, आपोआप इथे येऊन बसायला तू काय हवा आहेस की काय? आम्ही तुला उचलून इथे तुरुंगात आणलं.''

शिपायाचं ते बोलणं ऐकून दारूड्या चांगलाच सटपटला. आपण जरी दारूच्या नशेत आगाऊपणा केला असला, तरी बादशहाच्या दृष्टीनं तो अपराधच होता. आता मिळेल ती शिक्षा भोगण्याला काही पर्याय नाही, असा विचार त्याच्या मनात येऊन तो हवालदिल झाला. तितक्यात दुसऱ्या काही कामानिमित्त प्रत्यक्ष बिरबल तुरुंगात आलेला त्याला दिसला.

त्यानं त्या रक्षकाच्या हातापाया पडून बिरबलाची गाठ घालून द्यायला सांगितलं. रक्षकानं बिरबलाला ती विनंती ऐकवल्यावर बिरबलानं त्या दारूड्याला समोर आणायला सांगितलं. बिरबलाच्या समोर येताच त्यानं त्याच्या पायावर अक्षरश: लोळण घेतली. म्हणाला, ''सरकार, मला माझा अपराध मान्य आहे. पण, मी दारूच्या नशेत होतो. चुकून अपराध घडलेला आहे माझ्या हातून. तुम्ही काहीतरी करून मला वाचवा ना.''

बिरबल म्हणाला, ''मी का वाचवू तुला? बाहेर जाऊन तू पुन्हा दारू पिशील आणि पुन्हा नवे अपराध करून इथे येशील. दारूच्या नशेत होतास म्हणून तुला दरवेळेला माफ का करत राहायचं? तू दारू पितोस आणि नशेत चुकीचं वागतोस यात इतरांचा काय दोष?''

तो दारूड्या गयावया करत म्हणाला, ''सरकार, मी पाहिजे तर शपथ घेतो की मी पुन्हा कधी आयुष्यात दारूला हातही लावणार नाही; पण या खेपेला मला माफ करा.''

बिरबलाला त्याची दया आली. नशेत उद्धटपणा करण्यापलीकडे त्यानं कोणताही भयंकर अपराध केलेला नव्हता; पण बादशहाच्या रागाला मात्र तो आता बळी पडणार होता. बिरबल त्याला आधी खूप रागावला आणि मग त्याला त्यानं एक युक्ती सांगितली.

दुपारच्या वेळी त्या दारूड्याला दरबारात सुनावणीसाठी हजर करण्यात आलं.

तो समोर येताच बादशहाचं पित्त चांगलंच खवळलं. तो उपहासानं ओरडला, ''या, या, या, राजे. या. हत्ती हवा होता ना तुम्हाला? विकत घ्यायचाय ना हत्ती?''

ते ऐकताच तो दारूड्या जमिनीवर लोळण घेत म्हणाला, ''नाही, नाही, सरकार. मी कुठला आलोय राजा. माझ्या अंगात संचारलेलं राजाचं भूत कधीच उतरलं. आता मी तुमच्यासमोर उभा आहे तो फक्त एक गरीब



कामगार. मला माफ करा सरकार. हत्ती विकत घ्यायचीच काय, त्याला हात लावायचीसुद्धा ऐपत नाही माझी.'' त्याची ती अवस्था पाहून बादशहाला त्याची कीव आली. तो म्हणाला, ''काय रे, तुला हे सगळं बोलायला कसं काय सुचलं?'' डोकं बडवून घेत तो म्हणाला, ''मला कुठलं सुचतंय कपाळ! मला ही युक्ती बिरबल महाराजांनी दिली.''


ते ऐकल्यावर बादशहा गालातल्या गालात हसला. बिरबलाकडे वळून तो म्हणाला, ''बिरबल, आता तूच ठरव याला काय शिक्षा द्यायची ते; कारण काही तरी शिक्षा झाल्याशिवाय काही हा सुधारणार नाही.''

बिरबल म्हणाला, ''सरकार, याला महिनाभर शाही हत्तींना अंघोळ घालायची शिक्षा देऊया आपण. म्हणजे हा प्रसंग आणि हत्ती चांगलेच लक्षात राहतील त्याच्या.''

बादशहानं ते मान्य केलं. आपली सुटका थोडक्यात झालेली पाहून दारूड्यानं अतिशय कृतज्ञतेनं बिरबलाकडे पाहून हात जोडले.



## पुस्तकाच्या पानांतून




# अकबराचा जप
## आणि इतर कथा


■

लेखक
**मंजूषा आमडेकर**

# माणिक कसं होतं?

बिरबलाच्या समोर एकदा दोन सख्ख्या भावांमधला खटला आला. एका भावानं दुसऱ्या भावावर चोरीचा आळ घेतला होता. आरोपी भावाचं नाव होतं जयचंद आणि फिर्याद देणाऱ्या भावाचं नाव होतं सत्यशील. जयचंद खाऊन-पिऊन सुखी असलेला मध्यमवर्गीय माणूस होता तर सत्यशील अतिशय श्रीमंत. त्यामुळे स्वाभाविकच सत्यशीलची बाजू तगडी होती. दुसऱ्या मध्यमवर्गीय माणसानं पैशाच्या लोभानं म्हणा किंवा गरजेपोटी चोरी केलेली असू शकते असंच कुणालाही वाटलं असतं; पण बिरबलाचं काम होतं सत्य शोधून काढणं, निरपराध माणसाला न्याय मिळवून देणं आणि अपराध्याला शिक्षा करणं.

त्यामुळे वरकरणी काहीही दिसत असलं तरी अंदर की बात काय आहे, हे नीट पडताळून पाहणं गरजेचं होतं. त्यामुळे त्यानं चौकशीला सुरुवात केली. सत्यशील म्हणाला, ''सरकार, माझा हा भाऊ बरेच दिवस मला भेटला नव्हता; कारण मीच माझ्या व्यापात असतो, फार मोठा व्याप आहे माझा.'' भाव खात इकडे-तिकडे बघत तो पुढे म्हणाला, ''म्हटलं, याला जेवायला बोलवावं आणि मनसोक्त गप्पा कराव्यात सुख-दु:खाच्या. मग मी याला माझी नवीन खरेदी दाखवली. मी नुकतंच एक सुंदरसं माणिक खरेदी केलं होतं. खूपच महागडं होतं ते. तेवढ्यात कुणीतरी मला भेटायला आलं म्हणून



मी बाहेर गेलो. थोड्या वेळानं येऊन पाहतो तर काय, माणिक गायब आणि हा- ही गायब. माझी पक्की खात्री आहे की ते यानंच चोरलेलं आहे; कारण याच्या मुलीचं लग्न तोंडावर आलंय आणि याची परिस्थिती काही फारशी चांगली नसल्यामुळे त्याला पैशाची गरज असणार, म्हणून यानं ते ढापलेलं असावं. सरकार, माझं माणिक मला परत मिळवून द्या हो.''

बिरबलानं ते ऐकून घेतलं आणि जयचंदला विचारलं, ''तुझं काय म्हणणं आहे यावर?'' जयचंद अत्यंत साधा वाटत होता. तो डोळ्यांत पाणी आणून म्हणाला, ''सरकार, मुळात मी चोरट्या वृत्तीचा माणूसच नाही. आणि त्यातून सख्ख्या भावाच्या घरी चोरी करण्याइतका नीच तर नक्कीच नाही. मी ते माणिक घेतलेलं नाही, फार काय, ते काळं की गोरं तेही मी पाहिलेलं नाही. वाटलं तर माझ्या घराची आणि माझी झडती घ्या.' बिरबलाला जयचंद निरपराध असावा असं वाटलं.

तो सत्यशील मात्र चांगलाच बिलंदर वाटत होता; पण नुसत्या वाटण्यावर न्यायनिवाडा होत नसतो. तिथे साक्षीदारांची आणि पुराव्याची गरज असते. त्यामुळे बिरबलानं सत्यशीलला विचारलं, ''काय रे, तू म्हणतोस त्याला काही पुरावा आहे का? कुणी साक्षीदार आहेत का?''

सत्यशील म्हणाला, ''हो तर, चांगले चार साक्षीदार आहेत. त्यांनी स्वत:च्या डोळ्यांनी पाहिलंय याला चोरी करून निघून जाताना.''

बिरबल म्हणाला, ''ठीक आहे, उद्या त्या चार साक्षीदारांना इथे हजर करा, म्हणजे मग पुढचा खटला चालवता येईल.''

दुसऱ्या दिवशी सत्यशील, जयचंद आणि चार साक्षीदार दरबारात हजर झाले. जयचंद आरोपी असल्यामुळे त्याला कोठडीत ठेवलेले होते. दरम्यान, बिरबलानं सत्यशील आणि जयचंद दोघांचीही माहिती काढली होती. शिवाय कोठडीत जयचंदचं वागणं कसं आहे, हेही त्यानं माहीत करून घेतलं होतं. सत्यशील अत्यंत लबाड माणूस होता. काळे धंदे करून, लोकांना टोप्या घालून तो श्रीमंत बनलेला होता. याउलट त्याचा भाऊ जयचंद हा फारच सचोटीनं वागणारा पापभीरू माणूस होता.

सरळमार्गीपणानं वागत असल्यामुळेच तो भावाइतका श्रीमंत होऊ शकलेला नव्हता. आणि त्याला भावाचं वागणं पसंतही पडत नव्हतं. याच विषयावरून त्यांच्यात बऱ्याचदा वाद व्हायचे आणि त्यामुळेच ते एकमेकांना भेटत नव्हते. कोठडीतला एक दिवससुद्धा जयचंदनं अत्यंत चांगुलपणानं घालवलेला होता. बिरबलासमोर चारी साक्षीदारांना हजर करण्यात आलं. ते चार वेगवेगळे व्यवसाय करणारे लोक होते. केशकर्तन करणारा न्हावी, कपडे

शिवणारा शिंपी, चर्मकार असलेला चांभार आणि पानाचे विडे बनवणारा तांबोळी असे चारजण समोर आलेले पाहून बिरबल त्यांना म्हणाला, ''तुम्ही एकेकजण दुसऱ्या दालनात मला भेटा.''

बिरबल स्वत: दुसऱ्या दालनात जाऊन बसला आणि तिथे एकेकजण साक्ष देण्यासाठी यायला लागला. सर्वांत आधी आला न्हावी. बिरबलानं त्याला विचारलं, ''काय रे बाबा, तू तिथे हजर होतास का, माणिक चोरताना जयचंदला तू पाहिलं होतंस का, आणि ते माणिक कसं होतं?'' त्यावर तो म्हणाला, ''सरकार, मी स्वत:च्या डोळ्यांनी पाहिलं त्याला चोरी करताना. मी तिथेच होतो की आणि माणिक म्हणाल, तर ते... ते चांगलं वस्तऱ्याएवढं मोठं होतं.''

पहिली साक्ष ऐकताच बिरबलाला हसू आलं आणि त्याची खात्री पटली की हे खोटे साक्षीदार आहेत; पण कायद्याप्रमाणे जाणं तर भाग होतं, त्यामुळे त्यानं पुढच्या तिन्ही साक्षीदारांना बोलावून हेच प्रश्न विचारले. प्रत्येकानं न्हाव्यासारखीच उत्तरं दिली. फक्त माणकाचं वर्णन मात्र प्रत्येकानं वेगवेगळं केलं. शिंपी म्हणाला, ''महाराज, माणिक सुईसारखं बारीक आणि लांब होतं बघा.''

चांभार म्हणाला, ''अहो, ते माणिक चांगलं चपलेएवढं मोठ्ठं होतं!''

तांबोळी म्हणाला, ''सरकार, ते माणिक विड्याच्या पानाइतकं मोठं होतं.'' बिरबल पोट धरधरून हसायला लागला; कारण ते सगळे खोटी साक्ष देत होते. ते इतके गरीब होते की प्रत्यक्षात त्यांनी माणिक कधीही साधं पाहिलेलंही नव्हतं. त्यामुळे प्रत्येकानं आपापली कल्पना लढवून स्वत:च्या व्यवसायातल्या वस्तूएवढं होतं असं ठोकून दिलं होतं.

बिरबलानं चौघांना दरबारात बोलावलं आणि शिपायांना सांगितलं ''या चौघांना चाबकाचे दहा दहा फटके द्या प्रत्येकी, खोटी साक्ष दिल्याबद्दल.'' त्याबरोबर चौघं बिरबलाच्या पायावर लोळण घेऊन म्हणाले, ''सरकार, आम्हाला माफ करा. आम्ही खोटी साक्ष दिली; कारण या सत्यशीलनं आम्हाला त्याबद्दल प्रत्येकाला वीस-वीस सुवर्णमुद्रा द्यायचं वचन दिलं होतं. प्रत्यक्षात आम्ही त्याच्या घरी गेलोसुद्धा नव्हतो. या खेपेला आम्हाला माफ करा सरकार, आम्ही पुन्हा अशी चूक करणार नाही.''

त्यानं सत्यशीलला खडसावून विचारलं, ''आता तूही खरं बोलतोस... का कसं...?''

सत्यशील घाबरूनच गेला होता. तो गयावया करत म्हणाला, ''सरकार, चूक झाली. मी माझ्या सज्जन भावावर खोटा आरोप केला; कारण तो कायम



मला उपदेश करत असायचा, की खोटेनाटे व्यवहार करू नकोस म्हणून. माझे कान किटले होते त्याचा उपदेश ऐकून. शिवाय त्याला माझे काळे धंदेपण माहीत झाले होते. तो कुठेतरी बोलेल म्हणून मी त्याचा काटा काढायचं ठरवलं आणि त्याच्यावर खोटा आळ घेतला. प्रत्यक्षात तो माझ्या घरी जेवायलाही आला नव्हता आणि माझं माणिकही त्यानं चोरलेलं नाही.'' हे ऐकल्यावर बादशहा चिडला. म्हणाला, ''आपल्या सज्जन भावाशी वाईट वागल्याबद्दल आणि इतर काळे धंदे केल्याबद्दल याला चांगली कडक शिक्षा सुनाव.''

बिरबल म्हणाला, ''सत्यशील हा नाव मोठं आणि लक्षण खोटं असंच वागत आला आहे. त्यामुळे त्याला मी एक वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा सुनावतो. शिवाय जयचंदची अब्रूनुकसानी केल्याबद्दल नुकसान भरपाई म्हणून सत्यशीलनं त्याला पाच हजार सुवर्णमुद्रा द्याव्यात असा आदेश देतो. चारी खोट्या साक्षीदारांना एक आठवड्याची शिक्षा देतो आणि निरपराध जयचंदला सन्मानपूर्वक सोडून देतो.''

बिरबलाचा निवाडा ऐकून जयचंदचे डोळे पाण्यानं डबडबले. तो म्हणाला, ''सरकार, मी काळजीत होतो. माझ्या मुलीचं लग्न तोंडावर आलेलं असताना मीच गुन्हेगार ठरलो असतो तर माझ्या मुलीशी कुणी लग्न केलं असतं? तुमचे आभार मानावेत तितके थोडेच आहेत.'' आणि मग डोळे पुसत तो आनंदानं घरी निघून गेला. लवकरच त्याला पाच हजार सुवर्णमुद्राही मिळाल्या.


# बादशहापेक्षा मोठे कोण?

एक दिवस बादशहानं दरबारात असा प्रश्न विचारला की सगळ्या सरदारांची तोंडंच शिवली गेली जणू. बादशहानं विचारलं, ''बादशहापेक्षा मोठा कोण आहे?''

आता याचं उत्तर काय द्यावं, कुणालाच कळेना; कारण दुसरं कुणीतरी मोठं आहे असं सांगितलं तर बादशहाची नाराजी पत्करावी लागणार. त्यामुळे सगळ्यांनी एकमुखानं सांगितलं, ''सरकार, हे काय विचारणं झालं? बादशहापेक्षा मोठं कोण असणार? बादशहाच सर्वांत मोठा असतो.''

बादशहाला काही ते उत्तर आवडलं नाही. तो म्हणाला, ''हे पाहा, विनाकारण माझी खोटी स्तुती करू नका. जे सत्य असेल तेच सांगा.''

मग काही सरदार हिंमत करून म्हणाले, ''खाविंद, बादशहापेक्षा ईश्वर मोठा असतो.'' बादशहाला हेही उत्तर पसंत पडलं नाही. तो म्हणाला, ''मी पृथ्वीवर राहणाऱ्या माणसांबद्दल बोलतोय. ईश्वर सर्वांत मोठा आहे यात काही वादच नाही; पण इथे, या धरतीवर बादशहापेक्षा मोठा कोण आहे?'' आता मात्र कुणीच काही बोलेना. बिरबल तर पहिल्यापासूनच शांत होता. शेवटी न राहवून बादशहानं त्यालाच विचारलं, ''काय रे बिरबल, तू काहीच का बोलत



नाहीस? तुझं काय म्हणणं आहे?''

बिरबल म्हणाला, ''सरकार, माझ्या मते लहान मूल हे बादशहापेक्षा मोठं असतं.'' त्याचं उत्तर ऐकून सगळा दरबार पोट धरून हसायला लागला. सगळ्यांना वाटलं, ''काय वेडपट आहे हा बिरबल! काहीही बरळत असतो. बादशहा आता चांगली चंपी करणार याची. मजाच येईल बघायला.'' आणि सगळेजण पुढे काय घडतं ते कुतुहलानं पाहायला लागले. बादशहा मात्र हसला नव्हता; कारण बिरबल जे बोलतो ते विचाराअंतीच हे त्याला माहीत होतं. त्यामुळे तो म्हणाला,

''तू हे कशावरून सांगतोस? पटवून देऊ शकशील का?''

बिरबल म्हणाला, ''जरूर. फक्त मला चार दिवसांची मुदत द्या.'' बादशहानं ती दिली. पुढील चार दिवस दरबाराच्या कामकाजात बादशहा हा विषय विसरूनही गेला होता.

एके दिवशी बिरबल अचानक दरबारात एक सुंदरसं, चुणचुणीत लहान मूल घेऊन आला. त्याच्या वागण्या-बोलण्यात इतकी धिटाई होती की प्रत्येकजण तोंडात बोट घालत होता. सगळ्यांनाच ते मूल इतकं हवंहवंसं वाटलं की सगळेजण त्याला जवळ घेऊन त्याचे लाड करायला लागले. बादशहानंही त्याला जवळ बोलावलं. ते मूल लगेच तुरुतुरु चालत बादशहाजवळ गेलं आणि त्याच्या मांडीवर चढून बसलं.

बादशहानं त्याला प्रेमानं जवळ घेतल्यावर त्यानं बादशहाची दाढी




ओढायला सुरुवात केली. मग त्याच्या गळ्यातल्या माळा ओढल्या. आणि मग त्यानंतर ते मूल चक्क लाथा मारायला लागलं बादशहाला. तरी बादशहा आपला हसतच होता. तो बिरबलाला म्हणाला, ''पाहिलंस बिरबल, हा माझ्या दाढी-मिशा ओढतोय आणि लाथाही झाडतोय.''


बिरबल म्हणाला, ''सरकार, प्रत्यक्ष बादशहाशी असं वागणाऱ्या या मुलाला चांगली कडक शिक्षा द्यायला हवी.''

बादशहा म्हणाला, ''अरे, वेडा की काय तू बिरबल? किती झालं तरी ते लहान मूल आहे, त्याला काय कळतंय आपण काय करतोय ते? लहान मुलाला कुणी शिक्षा करतं का? त्यांना कसंही वागण्याचा हक्कच आहे. ती कशीही वागली तरी चालतं.''

बिरबल एकदम म्हणाला, ''याचा अर्थ बादशहाची दाढी ओढणारं आणि त्याला लाथा मारणारं मूल बादशहापेक्षा मोठं झालं ना? ते बादशहापेक्षा जास्त श्रेष्ठ ठरतं ना?'' चार दिवसांपूर्वीचा विषय अचानक बादशहाला आठवला आणि तो मनापासून हसला. म्हणाला, ''बिरबल, तुझं उत्तर बिनतोड होतं. आता या मुलाला भरपूर खाऊ, खेळणी आणि कपडेलत्ते द्या आणि त्याच्या घरी पोचवा. दरबारी कामाची खोटी होतेय.''



## पुस्तकाच्या पानांतून




# चिलखताची पारख
## आणि इतर कथा

■

लेखक
**मंजूषा आमडेकर**

# चिलखताची पारख

अकबर बादशहाच्या दरबारातले कितीतरी सरदार बिरबलावर सतत खार खाऊन असायचे. कुठल्या ना कुठल्या तरी प्रकारे बिरबलाला त्रास कसा देता येईल हेच ते पाहत असत. त्यातले काही सरदार तर इतके दुष्ट होते की ते इतर सर्वांशीच नीचपणे वागत असत.

सलीम आझाद हा अशाच काही सरदारांपैकी एक सरदार. तो लोकांना जुलमीपणानं वागवत असे. एकदा त्याचं एका शिवसेन नावाच्या लोहाराशी पैशावरून भांडण झालं. हा शिवसेन बिरबलाच्या खास मर्जीतला लोहार होता. त्याला कारणही तसंच होतं. तो अतिशय कष्टाळू आणि प्रामाणिक होता. त्यामुळे बिरबलानं त्याला लष्करातल्या प्रमुख वीरांसाठी चिलखतं बनवण्याची खास कामगिरी दिलेली होती.

या एका कारणासाठी तर सलीम आझादचा शिवसेनवर राग होताच. त्यातून त्यानं कमी पैशात शिवसेनकडून चिलखत मिळवण्यासाठी त्याच्यावर अरेरावी केल्यावर शिवसेननं त्याला नकार दिला, म्हणूनही त्याचा त्याच्यावर राग होता. 'एक फालतू लोहारडा, माझ्यासारख्या मोठ्या सरदाराचं ऐकत नाही म्हणजे काय, थांब म्हणावं लेका, तुला चांगलाच धडा शिकवतो...!' असा त्याच्या मनातून संताप खदखदत असतानाच एके दिवशी त्याच्यासमोर एक नामी संधीही आयतीच चालून आली.



शिवसेननं एक अतिशय मजबूत असं चिलखत तयार केलं. त्याच्या मनात असं आलं, की हे चिलखत प्रत्यक्ष बादशहाकरताच योग्य आहे. त्याला जर आपण हे दिलं तर आपल्याला चांगलं घसघशीत इनाम मिळेल.

हा विचार मनात येताच तो ते चिलखत घेऊन बादशहापुढे हजर झाला. शिवसेन म्हणाला, ''सरकार, हे इतकं मजबूत आहे, की मला ते खास तुमच्यासाठीच ठेवावं असं वाटलं.'' बादशहा ते नीट निरखून पाहत होता. त्या दिवशी नेमका काही कारणानं बिरबल दरबारात आला नव्हता.

सलीम आझादचे डोळे चमकले. दांतओठ खात तो मनात म्हणाला, ''सापडलास लेका. आता बघच मी कसा सूड घेतो तुझा ते!'' पण, वरकरणी तो अतिशय गोड आवाज काढून म्हणाला, ''सरकार, हा लोहार फारच कुशल आहे यात काही वादच नाही. प्रत्यक्ष बिरबलानंच त्याला निवडलंय, म्हटल्यावर तर काही बोलायलाच नको खरं तर; पण प्रश्न प्रत्यक्ष बादशहा सलामतांच्या जिवाचा आहे. त्यामुळे मला आपलं वाटतं, की या चिलखताची परीक्षा घेतल्याखेरीज काही निर्णय घेतला जाऊ नये.'' मग इकडे-तिकडे नजर टाकत तो इतर सरदारांना म्हणाला, ''काय मंडळी, बरोबर बोलतोय ना मी?''

त्यावर त्याच्या इतर पाठीराख्यांनी लगेच माना डोलावून 'हो ला हो,' केलं. बादशहानं ते मान्य करताच लगेच सलीम पुढे झाला आणि त्यानं ते चिलखत जमिनीवर ठेवून त्यावर तलवारीचा वार केला. त्यासरशी त्याचे दोन तुकडे झाले. ते पाहून बादशहा चांगलाच खवळला. म्हणाला, ''हे इतकं तकलादू चिलखत तू खास माझ्यासाठी बनवलं होतंस? तुझा नक्की हेतू काय होता? मी युद्धात जखमी व्हावं, असं वाटत होतं की काय तुला? एवढ्यासाठी तुला खास नोकरीवर ठेवलं होतं का? ते काही नाही, आजपासून तुझी नोकरी संपली आहे. चालता हो.''

शिवसेन बिचारा थरथर कापायला लागला. त्यातच सलीम आझाद आणि इतर दुष्ट सरदारांनी बादशहाच्या रागात भरच घातली. संतापलेल्या बादशहानं शिवसेनाचं काही एक ऐकून न घेता त्याला दरबारातून हाकलून दिलं. दु:खी मनानं तो घरी परत आला. नोकरी तर गेलीच होती; पण दुर्दैवानं पुढे त्याचा धंदाही चालेनासा झाला; कारण सलीम आझादनं त्याची पद्धतशीर बदनामी सुरू केली. त्यामुळे त्याच्याकडून कुणी काही खरेदी करेचना. धंदाच बसल्यावर जगायचं कसं, बायकोपोरांना खायला काय घालायचं, अशा

संकटात बिचारा शिवसेन सापडला आणि खचलाच.

मग त्याच्या म्हाताऱ्या वडिलांनी त्याला धीर दिला. ते म्हणाले, ''शिवसेना, असा हातपाय गाळून बसू नकोस. चल, आपण बिरबल महाराजांना भेटूया. ते काहीतरी मार्ग काढतीलच नक्की यावर.''

शिवसेनला ते पटलं. मग बाप-लेक बिरबलाकडे गेले आणि त्यांनी त्याला सगळी हकिकत सांगितली.

म्हातारा बाप म्हणाला, ''महाराज, काहीतरी युक्ती करा आता. घरी कच्चीबच्ची उपाशी राहायची पाळी आलीय.''

बिरबलानं सगळं ऐकून घेतलं आणि तो म्हणाला, ''यातून मार्ग काढणं मुळीच कठीण नाही; पण तुम्ही दोघंही इतके कुशल कारागीर आहात; पण चिलखत जमिनीवर ठेवून वार केल्यावर त्याचे तुकडे होतातच, ही साधी गोष्ट तुमच्या लक्षात कशी काय आली नाही?''

त्यावर शिवसेन कळवळून म्हणाला, ''महाराज, लक्षात न यायला काय झालं? मी सांगायला तोंड उघडायचा प्रयत्न करतच होतो; पण त्या सलीम आझादांनी डाव साधला. सरकारांना बिथरवलं. मग ते एकदा रागावल्यावर कुणाचं काही ऐकतात होय?''

बिरबलाला ते पटलं. बादशहा चिडल्यावर त्याच्यापुढे कुणाचंच काही चालायचं नाही हे तर खरंच होतं.

मग तो नरमाईनं म्हणाला, ''बरं, बरं. असू देत. आता मी सांगतो ती युक्ती कर.'' असं म्हणून त्यानं त्याच्या कानात काहीतरी सांगितलं. त्यावर ते बाप-लेक मोठ्या आनंदानं ते मान्य करून घरी निघून गेले.

आणखी आठ दिवसांनी शिवसेन पुन्हा एक नवं चिलखत घेऊन बादशहासमोर हजर झाला. त्याला पाहताच बादशहाच्या कपाळावर आठ्या आल्या. तो म्हणाला, ''तू? पुन्हा का आलास?''

शिवसेन अजिजी करत म्हणाला, ''सरकार, मला एक संधी द्या. आज मी चांगलं भक्कम चिलखत खास तुमच्यासाठी बनवून आणलंय; पण त्याची परीक्षा तुम्ही स्वत:च करावीत अशी माझी विनंती आहे; कारण सरकार, मी माझं काम मन लावून उत्तम करतो. ते माझं नावच जर धुळीला मिळालं तर जगण्याला तरी काय अर्थ आहे? त्यापेक्षा आपल्या हातून आलेलं मरण पत्करलं.''

असं म्हणून त्यानं आपल्या अंगातला अंगरखा काढून टाकला. आतमध्ये तो ते चिलखत घालून आला होता. तो थेट बादशहाच्या समोर



जाऊन उभा राहिला. बिरबलानं बादशहाला आग्रह केला, ''खाविंद, तो इतक्या आत्मविश्वासानं बोलतोय, तर पाहा ना आजमावून. स्वतःच्या जिवावर उदार झालाय तो. तेव्हा नक्कीच ते चिलखत मजबूत असणार.''

बादशहाला बिरबलाचं म्हणणं खोडून काढता येईना. तो उठला आणि त्यानं आपली तलवार उपसून शिवसेनाच्या छातीवर जोरात वार केला.

शिवसेनानं घातलेल्या चिलखतावर ती तलवार घासली गेली आणि त्यातून ठिणग्या उडाल्या; पण चिलखताला काहीही झालं नाही. शिवसेन हसत हसत उभाच होता. ते पाहून बादशहालाही कौतुक वाटलं आणि आनंदही झाला.

तो म्हणाला, ''शाब्बास, तुझी कारागिरी आणि तुझी दिलेरी... मला दोन्ही पसंत आहे. तुला तुझी नोकरी तर मी परत देतोच आहे; पण आजपासून तू नेहमी करत असलेल्या खास कामासाठी तुला दुप्पट पगार मिळत जाईल. असंच उत्तम काम करत राहा.''

शिवसेन मोठ्या आनंदानं घरी परत गेला. सलीम आझाद आणि त्याच्या दुष्ट मित्र सरदारांची तोंडं काळीठिक्कर पडली. त्याच रात्री शिवसेन आणि त्याचा म्हातारा बाप बिरबलाला भेटायला त्याच्या घरी गेले. त्यांनी आणखी एक मजबूत चिलखत खास बिरबलाकरता बनवून आणलं होतं. ते त्याला भेट म्हणून दिलं.

# राजलक्ष्मी

पूर्वीच्या काळी राजारजवाड्यांकडे नोकरचाकर पिढीजात सेवा करत असत. अकबर बादशहाच्या दिमतीलाही असेच काही नोकर होते. त्यात काहा म्हातारेही होते. एक राजलक्ष्मी नावाची म्हातारी दासी तिच्या बालपणापासून  मुघल सम्राटांकडे चाकरी करत होती. म्हातारपणामुळे तिच्या हातून आता फारसे काम होत नसे; पण त्या काळी नोकरांना आजकालच्या काळासारखं पेन्शन थोडंच होतं? त्यांना तर मरेपर्यंत काम करतच राहावं लागायचं.

त्यामुळे राजलक्ष्मीही थकलेली असूनही नोकरी करतच होती. एकदा तिच्या हातून एक काम बादशहाला हवं तसं झालं नाही. झालं. तेवढ्यावरून बादशहाचं बिनसलं. तो तिरसटून तिला हवं तसं बोलला आणि  म्हणाला, ''चालती हो, मला पुन्हा तोंड दाखवू नकोस. उद्यापासून नोकरीवर  येण्याची गरज नाही.''

म्हातारी राजलक्ष्मी बिचारी खचलीच ते ऐकून. तिनं खूप गयावया केलं, ''सरकार, माफ करा मला. आता या वयात कुठे ठोकरा खात फिरू मी? मला कोण कामावर ठेवून घेणार?'' पण बादशहा इतका संतापलेला होता की





त्याला तिची मुळीच दयामाया वाटली नाही. त्यामुळे ती रडत रडत थेट बिरबलाकडे जाऊन पोहोचली.


त्याच्या कानावर सगळी कहाणी घालून ती डोळ्यांत पाणी आणून म्हणाली, ''आता कसंही करून मला नोकरी परत द्या महाराज. नाहीतर मी जगावं कसं?''

बिरबलानं तिला धीर दिला. त्याला मनापासून वाईट वाटत होतं. बादशहानं इतकं कठोर व्हायला नको होतं असं त्याला वाटून गेलं; पण इथे आता युक्तीच कामी येणार होती; कारण बादशहाला सरळ सांगून काही पटेलच याची खात्री नव्हती. मग त्यानं तिच्या कानात एक युक्ती सांगितली. त्याबरोबर ती हसत हसत निघून गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी बादशहानं उठल्याबरोबर टाळी वाजवली आणि आवाज दिला, ''कोण आहे रे तिकडे?''

त्यासरशी राजलक्ष्मी पटकन बादशहासमोर जाऊन उभी राहिली आणि खणखणीत आवाजात म्हणाली, ''राजलक्ष्मी हजर आहे सेवेला, तिला जाऊ


दे की राहू दे?'' आता खरं तर तिला समोर पाहून बादशहा नाराजच झालेला होता; पण 'राजलक्ष्मी' या शब्दाचा दुसरा अर्थ 'राज्याचं वैभव किंवा ऐश्वर्य' असाही होतो. 'ते जाऊ दे' असं स्वत:च्याच तोंडानं कसं काय



म्हणायचं?

बादशहाचा अगदीच नाईलाज झाला. त्याला दुसरं काय करावं तेच सुचेना. त्यामुळे ओठावर आलेले, ‘चालती हो,’ हे शब्द बादशहानं मोठ्या कष्टानं गिळले आणि तो म्हणाला, ‘‘राजलक्ष्मीला राहू देत.’’ राजलक्ष्मी ते ऐकून गालातल्या गालात हसली आणि कामाला लागली. मनोमन बादशहानं तिच्या चातुर्याला दाद दिली खरी; पण त्याला काही राहवेना. त्यानं तिला बोलावून घेतलं आणि विचारलं, ‘‘काय गं, खरं खरं सांग, तुला हे बोलायला कसं काय सुचलं?’’ तिनंही कसलीही लपवाछपवी न करता सांगितलं, ‘‘सरकार, ही युक्ती मला बिरबल महाराजांनी सांगितली.’’

बादशहा मोठ्यानं हसला. म्हणाला, ‘‘तरीच. त्याच्याइतकं चतुर दुसरं कोण आहे या राज्यात?’’




# दयाळू बिरबल
## आणि इतर कथा

■

लेखक

**मंजूषा आमडेकर**

# जल्दी बुलाओ

एके दिवशी सकाळी नोकरचाकर रोजच्याप्रमाणे बादशहा झोपेतून जागा होण्याची वाट पाहत उभे होते. एकाच्या हातात गुलाबजल होतं, तर दुसऱ्याच्या हातात तस्त होतं. तिसरा एकजण मोठा रुमाल घेऊन उभा होता.

थोड्याच वेळात बादशहानं डोळे उघडले आणि काही क्षणांतच तो जोरात, ''जल्दी बुलाओ, जल्दी, जल्दी...'' असा ओरडायला लागला. नोकरांना काही कळेचना की तो कुणाला बोलवायला सांगतोय; पण विचारणार कोण? एकाचीही हिंमत होत नव्हती. एकमेकांच्या तोंडाकडे पाहत ते थरथर कापत उभे होते. आसपास आणखी एक नोकर होता, तो नेहमी बादशहाचे कपडे तयार ठेवायचा. त्याला काहीतरी सुचलं आणि तो धावतपळत बिरबलाकडे जाऊन पोहोचला.

धापा टाकत तो बिरबलाला घाईघाईनं सांगायला लागला, ''अहो, सरकार नुसतंच, जल्दी बुलाओ, म्हणून ओरडतायत; पण कुणाला बोलवायचं ते मात्र सांगतच नाहीएत. आता आम्ही काय करावं? मला असं वाटलं की त्यांना तुम्ही यायला हवे असाल. कृपा करून येता का माझ्यासोबत राजवाड्यात?''

बिरबलानं क्षणभर विचार केला. मग म्हणाला, ''मला एक सांग, सरकार




खूप चिडलेले होते का?'' नोकर म्हणाला, ''काही विचारू नका, त्यांनी आख्खा राजवाडा डोक्यावर घेतलाय. कुणालाच काही सुचत नाहीए.''


बिरबल म्हणाला, ''काय सांगतोस? पण उठल्या उठल्या इतकं चिडण्यासारखं झालं तरी काय? नेमकं काय घडलं ते सांग बरं. ते झोपेतच होते की उठून बसलेले होते? आणि नक्की काय करत होते?''

नोकर म्हणाला, ''हे बघा, आम्ही नेहमीप्रमाणे तयारीत उभे होतो सगळेजण. सरकार स्वारीला कधी जाग येतेय याची वाट पाहात होतो. अचानक सरकार जागे झाले, त्यांनी जरा आळस दिला, आरशात पाहिलं, आणि मग चेहऱ्यावरून हात फिरवत ते अचानक ओरडायलाच लागले, बुलाओ, बुलाओ, म्हणून. आता तुम्हीच सांगा, आम्ही नेमकं कुणाला बोलवायचं?'' तो नोकर बिचारा अगदीच हताश झालेला होता.

बिरबल जोरजोरात हसायला लागला. ते पाहून तो बिचारा आणखीनच हवालदिल झाला. काकुळतीला येऊन म्हणाला, ''तिकडे ते ओरडतायत आणि तुम्हाला इथे हसू येतंय? मधल्या मध्ये आमचे मात्र हाल होतायत. काहीतरी मार्ग तरी सुचवा ना.''

बिरबल हसू आवरत म्हणाला, ''अरे, सरकारांची दाढी वाढलेली आहे. तू ताबडतोब न्हाव्याला घेऊन जा त्यांच्याकडे.'' ते ऐकल्यावर नोकराला





हुश्श झालं अगदी. तो पळतच न्हाव्याकडे गेला आणि त्याला घेऊन बादशहाकडे गेला. त्याला पाहताच बादशहा एकदम शांत झाला. मग त्यानं छान आवरून घेतलं सगळं. पूर्वीचे न्हावी खूप गप्पिष्ट असायचे. हजामत करता करता ते इकडच्या बातम्या तिकडे पोहोचवायचे. बादशहानं त्याला गप्पांच्या ओघात विचारलं, ''काय रे, तू कसा काय आलास इथे? मी काही तुला बोलवायला सांगितलं नव्हतं.''

न्हाव्यानं प्रामाणिकपणे सांगून टाकलं, ''त्याचं काय झालं सरकार, तुमचा नोकर बिरबल महाराजांकडे गेला. आणि तुम्ही रागावला आहात, का ते कळत नाहीये, असं सांगितलं. त्यावर बिरबल महाराजांनी मला तुमच्याकडे घेऊन जायला सांगितलं. तोच तर घेऊन आला मला इथे.''

बादशहा हसला. म्हणाला, ''या बिरबलाला इतक्या अंतरावरूनही मला काय हवं ते नेमकं समजतं.''

# उजळ काय असतं?

आधीच मे महिन्यातले कडक उन्हाळ्याचे दिवस होते. त्यात आज विशेष गरम होत होतं. उकाड्यानं बादशहाचा जीव हैराण झालेला होता.

अचानक ढगांचा गडगडाट झाला. बघता बघता आकाशात काळे ढग दाटून आले. थोड्या वेळानं वळवाचा पाऊस सुरू झाला. पावसानं शहराला झोडपून काढलं अक्षरश:. आकाश इतकं भरून आलं होतं की सगळीकडे अंधारून आलं होतं. तेव्हा काही विजेचा शोध लागलेला नव्हता. त्यामुळे दरबारात अंधार झाल्यावर नोकरांनी पटापटा मशाली पेटवून आणल्या आणि कोपऱ्यांमधून कोनाड्यात खोचल्या.

अचानक बादशहानं सर्वांना प्रश्न विचारला, ''सर्वांत जास्त उजळ काय असतं, सांगा बरं?''

एक सरदार पटकन म्हणाला, ''सोपं आहे उत्तर, अहो, हिमालयातला बर्फ. तोच सगळ्यात जास्त उजळ असतो.''

दुसरा म्हणाला, ''छे, छे, बर्फ नाही, दूध सर्वांत जास्त पांढरंशुभ्र असतं अगदी.''

तिसरा म्हणाला, ''माझ्या मते तरी कापूस सर्वांत जास्त उजळ असतो.''





बादशहा बिरबलाला म्हणाला, ''काय बिरबल, तुला ही सगळी उत्तरं पटतात का? म्हणूनच गप्प आहेस वाटतं आज?''

बिरबल म्हणाला, ''नाही सरकार, यातलं एकही उत्तर बरोबर नाही; कारण वस्तू किती का पांढऱ्याशुभ्र असेनात, त्या दिसतात त्या केवळ दिवसाच्या उजेडात. त्यामुळे दिवसाइतकं उजळ दुसरं काही असूच शकत नाही.'' बादशहा म्हणाला, ''नाही बिरबल, आज काही मला तुझं म्हणणं पटत नाहीये. बर्फ, दूध आणि कापूस यांसारख्या वस्तू नक्कीच उजळ असतात. तरीपण तू इतक्या ठामपणे म्हणतोच आहेस, तर निदान सिद्ध तरी करून दाखव की.''

बिरबल 'ठीक आहे,' म्हणाला. मग त्यावर चार-आठ दिवस गेले. एके दिवशी बादशहा दुपारच्या वेळी जेवणानंतर महालात आराम करत होता. आकाश अंधारून आलं होतंच. बिरबलानं गुपचूप नोकराला महालाच्या दारं-खिडक्या बंद करायला सांगितल्या. दार बंद करण्यापूर्वी दाराजवळ आतमध्ये थोडा कापूस पसरून ठेवला आणि एका वाटीत दूध भरून ठेवलं. मग दार लावून बिरबल बाहेर बसून राहिला.

थोड्या वेळानं बादशहाला जाग आली. डोळे उघडून पाहतो तर काय, सगळीकडे मिट्ट अंधार होता. दिवसाउजेडी इतका अंधार का आहे, तेच बादशहाला कळेना. त्यानं नोकरांना हाका मारल्या; पण कुणीच ओ दिली

नाही की धावत आलं नाही. चडफडत बादशहा स्वत:च उठला आणि दाराकडे चालायला लागला. वाटेत त्याचा पाय कापसावर पडला. दिसत तर काहीच नव्हतं. अचानक काहीतरी मऊ पायाला लागल्यावर त्याला वाटलं काहीतरी प्राणीबिणी आहे की काय, त्यामुळे तो दचकलाच. थोडं पुढे गेला तर त्याचा पाय लागून दुधाची वाटी उलटी झाली आणि दूध सांडलं. तेही त्याच्या पायाला लागलं. शेवटी कसाबसा तो दाराजवळ पोहोचला आणि त्यानं दार उघडलं.

दार उघडल्यावर एकदम उजेड आत आला आणि त्याला कापूस आणि सांडलेलं दूध दिसलं. बादशहा आश्चर्यानं इकडे-तिकडे बघायला लागल्यावर त्याला समोर बिरबल दिसला. बादशहा चिडून म्हणाला, ''बिरबल, हा काय प्रकार आहे? माझ्या महालात अंधार करून वाटेत कापूस आणि दूध ठेवण्याचा मूर्खपणा कुणी केला?''

बिरबल साळसूदपणे म्हणाला, ''सरकार, मी तुमच्याच आज्ञेचं पालन करत होतो.''

बादशहा चकितच झाला. म्हणाला, ''मी कधी दिली आज्ञा असा खोडसाळपणा करायची?''

बिरबल म्हणाला, ''यात कसला आलाय खोडकरपणा? आत अंधार असला तरी दुधाच्या आणि कापसाच्या प्रकाशात तुम्ही सहजपणे बाहेर



चालत येऊ शकला असता. या वस्तू उजळ आहेत असं तुम्हीच तर म्हणाला होता.''

बादशहा म्हणाला, ''अरे, काहीतरीच काय बोलतोस? मी जरी तसं म्हणलो असलो तरी, वस्तू कितीही उजळ असल्या म्हणून त्या अंधारात दिसतात का? त्यांचा काही प्रकाश पडत नाही. त्या दिसायला उजेड नको का असायला दिवसाचा?''

बिरबल हसत हसत म्हणाला, ''खाविंद, खरं तर जे माझं म्हणणं होतं, तेच तुम्ही मला पटवून सांगताय. मी तरी वेगळं काय सांगत होतो?''

आत्ता कुठे बादशहाच्या डोक्यात प्रकाश पडला. आणि तो खो खो हसत सुटला. हसू ओसरल्यावर बादशहा म्हणाला, ''तू तरी कमालच करतोस बिरबल. तुझं सगळंच जगावेगळं असतं. आणि ते पटवून देण्याची तऱ्हाही जगावेगळीच असते.''

बिरबल हसत हसत म्हणाला, ''मग आता सांगा बरं, दिवसच सगळ्यात जास्त उजळ असतो की नाही?''

बादशहानं मान्य करून टाकलं. म्हणाला, ''नक्कीच असतो. शंकाच नाही.''






## कर हर मैदान फ़तेह !

‘पिछला दे जंजीरे
बना उनकी शमशीरें
कर हर मैदान फ़तेह
क्या बात है! कर हर मैदान फ़तेह!
पुन्हा एक प्रेरणादायी आत्मकथन! दोन
आत्मकथने एवढ्या विस्तृतपणे लिहावी असे
देखणे साजेसे जीवन आपल्या वाट्याला
आले. किंबहुना, आपण तसे ते घडवले!
खरेतर हे संचितच म्हणावे लागेल! त्यातून
विश्व निर्माण करून स्वतःच्या हिमतीवर,
बुद्धीवर व कष्टातून देशाच्या सर्वोच्च
सेवेतीलकरिअर करून स्वत:चा एक
वेगळाच आदर्श आपण उभा केला आहे.
एक प्रेरणादायी जीवनगाथा व गौरवगाथा
साकारली आहे.

आपले पुस्तक वाचले. शब्द न् शब्द, पान न् पान आख्खे पुस्तकच सर्वांगसुंदर झाले आहे. आपले खूप खूप अभिनंदन! आपले मनोगत तर अतिशय सुंदर झाले आहे. इतके सुंदर झाले आहे की दुसऱ्या कोणाच्या प्रस्तावनेची गरजच नाही. पुस्तक वाचून थक्क व्हायला झाले. किती काय ते अनुभव, किती गोष्टी,किस्से माहिती व ज्ञान! सुंदर श्लोक, सुंदर सुभाषिते, सुंदर विचार! सगळ्याचा खजिनाच जणू!

या पुस्तकाच्या रूपाने आपण जीवनाच्या

सर्वच अंगांना, विषयांना स्पर्श केला आहे व त्या अनुषंगाने सुंदर विवेचन, विश्लेषण व मार्गदर्शन केले आहे. अनेकांना हे पुस्तक पथदर्शक ठरणार आहे यात काही शंका नाही. जीवनातील सर्व रस, रंग शब्दाशब्दांतून पाझरले आहेत व लेखन रस, रंगाने आशयपूर्ण व सौंदयपूर्ण झाले आहे.




नेहमीप्रमाणेच आपली ओघवती भाषाशैली व मनाचा प्रांजळपणा भावला. आपले व्यक्तिमत्त्वच मुळी अंतर्बाह्य सुंदर आहे. अंतरंगातील सुंदरता दर्शनी झळकल्याशिवाय राहत नाही. प्रामाणिक कथनामुळे ते अधिक भावते व ह्रदयापर्यंत उतरते. 'ये ह्रदयीचे ते ह्रदयी' सुंदर नाते निर्माण होते. अंतरंगातील सच्चेपणामुळे निवेदनाला धार येते व त्याचा प्रभाव निश्चित पडतो. आपले शब्द वाचकांच्या अंतर्मनाला भिडतात. वाचताना कधी रोमांच उभे राहतात, कधी हास्य झळकते, तर कधी डोळे पाणावतात. मनामध्ये कधी प्रचंड ऊर्जा निर्माण होते, कधी स्फुरण चढते व मन खूप आशावादी बनते. हे आपल्या लेखनाचे सुयश आहे. आपल्या शब्दांमध्ये शक्ती व सौंदर्य यांचा अनोखा संगम आहे. शब्दांची ताकद व भाषेचे सौंदर्य यामुळे ते अधिकच उठावदार झाले आहे. आपणास लेखनाचं तंत्र, भाषेचे मर्म व सौंदर्य उमगले आहे, त्यामुळे ते सुंदर झाले आहे.

असे म्हणतात, सौंदर्याचा मार्ग हा ह्रदयापासून सुरू होतो व कर्तृत्वापाशी जाऊन थांबतो. आपले अंतरंग सुंदर व निर्मळ असल्यामुळे कर्तृत्व देदीप्यमान झाले आहे. आपली यशोगाथा देखणी, तर अवघे जीवन स्वर्णिम झाले आहे.

देखणी ती जीवने जी तृप्तीची तीर्थोदके
चांदणे ज्यातून वाहे पारदर्शी पाऱ्यासारखे
देखणी ती पाऊले जी या पंथे चालती
वाळवंटातूनसुद्धा स्वस्तिपद्मे रेखिती

देखणे ते हात ज्यांना निर्मितीचे डोहळे
मंगलाने गंधलेले सुंदराचे सोहळे!

असे सुंदर देखणे जीवन थोड्यांच्याच वाट्याला येते. स्वकर्तृत्वाने असे जीवन घडवले आहे व सर्वांसमोर आदर्श उभा केला आहे.

पुस्तकाच्या सुरुवातीला मसूरी येथील लबास्नामधील पायाभूत कोर्स व नंतर हैदराबादच्या NPA मधील५४ आठवड्यांचे खडतर प्रशिक्षण, तेथील चित्तथरारक अनुभव वाचून अंगावर रोमांच उभे राहिले. खरंच, IPS अधिकारी होणे किती महाकर्मकठीण आहे व त्यासाठी कोणकोणत्या दिव्यांतून जावे लागते हे आपल्या लेखनामुळे कळाले व आदर दुणावला. भारतमातेवरील आपले निस्सीम प्रेम, त्याग, समर्पण, सेवा, साधना, तपश्चर्या कळून आली व धन्य वाटले. खडतर प्रशिक्षणातून आपली शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक जडणघडण झाली. त्यामुळे महाराष्ट्राला एक तरुण, तडफदार, कर्तृत्ववान IPS अधिकारी मिळाला, ज्याने अल्पावधीतच आपल्या नावाचा ब्रॅन्ड तयार केला. स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली व तरुणांच्या मनात घर केले.

ज्याचा आदर्श व प्रेरणास्थान प्रौढप्रताप पुरंदर महापराक्रमी छत्रपती शिवाजी महाराज आहेत त्याला काय वर्णावे? शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती? निर्भय, निग्रही, शूर, धाडसी, पराक्रमी वृत्ती त्याच्या अंगी बाणणारच! किती आव्हाने आली, संकटे समोर ठाकली तरी न डगमगता संकटासही ठणकावून सांगावे 'आता ये बेहत्तर, नजर रोखुनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर!' असा निर्भीड पवित्रा असणारच! 'अडथळ्यांना भिऊन अडखळणं पावलांस पसंत नाही' हा लढाऊ बाणा असणारच!

आपल्या मनातील आदर्श व प्रत्यक्षात काम करताना त्याचा वस्तुपाठ आपण वेळोवेळी दाखवून दिला आहेच! आपल्या सेवाकालामध्ये अनेक आव्हाने, आंदोलने, मोर्चे, दंगली वा तत्सम आव्हानात्मक परिस्थिती, प्रसंग आपण अतिशय कौशल्याने व निर्भीडपणे व आत्मविश्वासाने हाताळले हे उच्च शिक्षण, उत्तम प्रशिक्षण, उदात्त विचार व संस्कार याचेच फलित आहे.

प्रसंगावधान, समयसूचकता, संवेदनशीलता व सद्सदविवेक बुद्धी या सर्वांचा तो परिपाक होता.

आयुष्याचा ताळेबंद, व्यवस्थापन आपण अतिशय सुंदर रीतीने केले आहे व मांडले आहे. उत्तम नियोजन, शिस्त, वक्तशीरपणा व चांगल्या सवयी असतीलतर जीवनाचा समतोलसर्व आघाड्यांवर उत्तम सांभाळला जातो, तसेच चांगला व्यायाम, चांगला आहार व पुरेशी विश्रांती हे शारीरिक पातळीवर तर प्रेम, सेवा, समर्पण हे मानसिक पातळीवर तसेच ३Fs, ३ Hs, ३Ss यांच्या सुयोग्य नियोजनामुळे व समतोलामुळे जीवन कसे आनंदी, सुखी व समाधानी होते हे आपण विविध गोष्टींनी पटवून दिले आहे.

दलाई लामा, इरिन हॅनसन, अमृता प्रीतम यांच्या व इतरही प्रसंगानुरूप व आशयानुरूप उद्धृत केलेल्या कविता खूप भावल्या. त्यातून जीवनाचा अर्थ अधिक व्यापक तर जीवनविषयक जाणिवा, संवेदना अधिक विस्तीर्ण झाल्या. त्याचप्रमाणे 'न्यू डायमेन्शन्स ऑफ हिलिंग' ग्रंथातील सद्‌गुण व सत्प्रवृत्तीचा शरीर व मनाच्या आरोग्याशी असलेला निकटचा संबंध व त्याविषयीचे विवेचन खूप आवडले. चार हार्मोन्सची माहिती राखोल मिळाली व पटली. 'जीवन म्हणजे प्रेम करणे, मदत करणे व सेवा करणे' किती साधा सरळ सुंदर मंत्र आहे! 'जीवनात रमले पाहिजे आणि ते रमणे अर्थपूर्ण असले पाहिजे म्हणजे जीवन एक सुंदर अवीट गीत बनून जाते? क्या बात कही है। ऐसी दिवानगी देखी नहीं कही! जीवनाचे तत्वज्ञान अतिशय सोप्या सुंदर भाषेत मांडले आहे.

निरामय, निरोगी जीवन व उत्तम आरोग्य लाभण्यासाठी आपक व्यायामाचे महत्व सातत्याने अधोरेखित केले आहे. तसेच मानसिक, नैतिक व आध्यात्मिक पातळीवर देखील निकोप राहुन जीवन कसे ऊर्जामय, उत्साही व निरामय बनते याचा कानमंत्र दिला आहे. आपला योगाभ्यासही सखोल आहे. सर्वांना उपयुक्त माहिती मिळाली आहे.

तरुणांसाठी तर आपण आयकॉन आहातच! तरुणांसाठी एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे व अखंड प्रेरणेचा स्रोत बनुन आपण दिशा व योग्य मार्गदर्शन केले आहे. तरुणाईशी आपण अविरत संवाद साधला. उत्साह आणि चैतन्य वाटले. त्यांच्याबरोबर समरस झाला व त्यांच्या मनात प्रचंड आशावाद निर्माण केला. 'सत्कर्म योगे वय घालवावे' याप्रमाणे तरुणांना घडवण्याचे, दिशा देण्याचे आपण सत्कर्मच केले आहे.

आपल्या सेवेमध्ये आपण नेहमीच 'महिलांचे सक्षमीकरण व सुरक्षा'

याला प्राधान्य दिले आहे, हे मला अधिक भावते.

स्त्रिया, त्यांचे प्रश्न, समस्या, त्यांच्यावरीलअत्याचार, अन्याय हे सर्व अतिशय संवेदनशील विषय आहेत आणि आपल्यासारखा एखादा संवेदनशील अधिकारीच हे समजू शकतो व सहानुभूतीने स्त्रियांचे प्रश्न हाताळू शकतो. आपण ज्या ज्या ठिकाणी काम केले, त्या त्या ठिकाणी निर्भया पथके तयार करून महिलांना व तरुण मुलींना सुरक्षिततेचे कवच उभे केले. ही काळाची गरजच असल्याने हे काम विशेष अभिनंदनीय ठरते. पान नं. २१० व २११ वरती केलेले महिला व मुलींसाठी मौलिक मार्गदर्शन व समुपदेशन खूप आवडले व पटले; कारण मलाही अगदी असेच वाटते. महिलांनी, मुलींनी संकटसमयी असाच निर्भयपणे प्रतिकार केला पाहिजे व वेळप्रसंगी रणरागिणीचे रूप धारण केले पाहिजे, याशिवाय राक्षसी मनोवृत्ती ठेचल्या जाणार नाहीत.

'मैं खाकी हूँ ... खाकी हूँ... सांजवाली बाती हूँ।' ही सुंदर कविता आपल्याकडून अनेकदा ऐकली आहे. आपले खाकीवरील, वर्दीवरीलप्रेम सर्वश्रेष्ठ आहे. आपल्यासाठी सारे खाकीमय - रंग खाकी, वर्ण खाकी, धर्म खाकी ! आपले देशप्रेम व राष्टसुरक्षेचा वादा केवळ शब्दांतून नाही तर २६/११च्या रात्री आपण कृतीतून दाखवून दिला आहे.

दुनिया में मिल जायेंगे आशिक कई
मगर वतन से खूबसूरत सनम नहीं होता।
सोने में सिमटकर नोटों में लिपटकर मरे हैं कई
मगर तिरंगे से खूबसूरत कफन नहीं होता।

याहून जीवनाची सुंदरता व सार्थकता ती काय? समर्पण, सेवा व त्याग या भावनेने आपण आजवर न थकता, न थांबता अखंडपणे उत्तम सेवा बजावलेली आहे. भारतमातेचा सुपुत्र म्हणून प्रामाणिक सेवेने परिश्रमपूर्वक रोज नवा 'विश्वास' घडवला आहे. लोकांच्या मनातही सदैव 'विश्वास' जागता ठेवला आहे.

Edgar Guest कवी आपल्या कवितेमध्ये विचारतो -

Have to you earned say, you your tomorrow? And, I am very happy have not on only earned. your past and present! your tomorrow but also

भूत, भविष्य व वर्तमान - कालाच्या तीनही पटांवर आपली कारकीर्द यशस्वी झालेली आहे.

आपने तो जिंदगी का हर मैदान फ़तेह कर लिया हैं और आगे भी करते रहेंगे। यही हमारा 'विश्वास' हैं।

आपल्या पुढीलप्रवासाला खूप खूप शुभेच्छा !

-सौ. स्वाती कुलकर्णी
कोल्हापूर

## नो नॉट नेव्हर





'नो नॉट नेव्हर' या कादंबरीचे लेखक बाबाराव मुसळे अत्यंत अभ्यासू वृत्तीचे आहेत. या कादंबरीचे कथानक सिद्ध करण्यासाठी त्यांनी अनेकांची मदत घेतली आहे, चर्चा केली आहे. त्या सर्वांविषयीचे ऋण सुरुवातीलाच त्यांनी व्यक्त केले आहे. वयाची पासष्ट वर्षे पूर्ण झाल्यावर 'टीन एजर्स'चा आव्हानात्मक विषय त्यांनी हाताळला. त्यात ते कितपत यशस्वी झाले, ते वाचकांनी ठरवायचे, असेही त्यांनी लिहिले आहे. त्यामुळे त्यांचे मनोगत विशेष महत्त्वाचे आहे. या कादंबरीतील दोन महत्त्वाची पात्रं म्हणजे अत्यंत ग्रामीण भागातील गरिबाघरची 'राणी' आणि श्रीमंताघरची 'मंकी' या दोन एकाच वयाच्या पात्रांचे एकत्र येणे. एकत्र प्रवास करणे, पुणे शहरात शिक्षणासाठी एकत्र राहणे, एका वर्गात शिकणे याची कारणे कादंबरीत सापडतात. त्यांचे रूपरंग, त्यांच्यातील वाद-संवाद, त्यांचे स्वभाव, विचार करण्याची प्रवृत्ती, मानसिकता, बौद्धिक क्षमता यातून मुसळे यांनी दोन व्यक्तिमत्त्वं डोळ्यांसमोर साक्षात उभी केली आहेत. इंजिनिअरिंग कॉलेजचे विषय काय असतात? इतकेच नव्हे, तर ते कॉलेजमध्ये कसे शिकवले जातात? किंवा इंजिनिअरिंग शिकताना विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकलही करावी लागतात, तर त्या प्रॅक्टिकलसमध्ये काय विषय असतात, इथपर्यंतची सूक्ष्म

निरीक्षणे या पुस्तकात त्यांनी नोंदवली आहेत. उदा. वर्गात त्यांनी 'सॉलिड स्टेट फिजिक्स' हे प्रकरण शिकवलं. त्यात पी-एन जंक्शन डायोड आणि झेनर जंक्शन डायोड यांच्या कॅरेक्टरिस्टिक्स पाहिल्या. त्यापैकी पी-एन जंक्शन डायोडच्या कॅरेक्टरिस्टिक्स आज तपासून पाहावयाच्या होत्या. 'राणीचा चेहरा वापरून बनवलेली घाणेरडी व्हिडिओ क्लिप आणि त्याद्वारे केलेले ब्लॅकमेलिंग', 'स्लीपर कोच ट्रॅव्हल' विषयीच्या काही नोंदी, 'इसाक'ची कहाणी, बोल्ड भट्टी, सुचिता मॅडम आणि राणी यांच्यातील संवाद, प्रिन्सिपॉलकडून राणीला 'आयडॉल ऑफ कॉलेज'चा किताब मिळणे, सिनेमातले काही कथानक, राणीच्या वडिलांना कारण नसताना पडलेला मार याची कथा, मासिक पाळीमध्ये मुली वापरत असलेले पॅड, कॉलेज आवारात बिनदिक्कतपणे निरोधचा वापर या संबंधित कथानक, डेटिंग, 'भिन्नलिंगी आणि समलिंगी' संबंधाविषयी चर्चा, रॅगिंग, जीएफ-बीएफ (गर्लफ्रेंड-बॉयफ्रेंड), जागतिक फ्रेंडशिप डे, (Yolo) (योलो म्हणजे यू ओन्ली लिव्ह वन्स!), सिड हल्ला, आत्महत्या, खोटे अटेन्डन्स देणे, 'टोपो' नावाचा कॉपीचा नवीन प्रकार, असे कितीतरी विषय एकाच कादंबरीमध्ये हाताळले आहेत. त्यामुळे ही कादंबरी अगदी तरुण पिढीलाही जवळची वाटेल! काही चमकदार वाक्ये संपूर्ण कादंबरीमध्ये अधेमधे पेरलेली आहेत. 'घरात झोपताना गोधडीवरची स्थिरता येथे क्षणभरही लाभत नव्हती.' किंवा 'भट्टीचं ब्लॅक बॅकग्राउंडवरचं हे पोल्युटेड पिक्चर तर राणीचं गोल्डन बॅकग्राउंडवरचं एनर्जेटिक, इन्थुझास्टिक, हाय स्पिरिटेड पिक्चर. दोन्ही परस्परविरोधी असले तरी दोन्हीचं आपापल्या ठिकाणी वेगळं महत्त्व आहे. उच्च शिक्षण घेताना येणारे आजच्या काळचे सगळे ज्वलंत प्रश्न आणि त्याला सामोरी जाणारी तरुण पिढी याचे उत्कृष्ट चित्रण या कादंबरीद्वारे लेखकाने केले आहे. ज्या तऱ्हेने कादंबरीची सुरुवात आहे त्यानुसार शेवटाकडे ती सरकताना वाचकाच्या मनात एक शेवट असतो, तर त्याला पूर्णत्वाने कलाटणी देणारा शेवट यात आहे, हेही या कादंबरीचे एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. खरोखरी कधी अंगावर शहारे आणणारी तर कधी सुखद रोमांच उठवणाऱ्या या कादंबरीचे वाचक नक्कीच स्वागत करतील!

ललित - एप्रिल २०२१


## बाजिंद




अतिशय वेगवान कथानक. मी एवढा वेगाचा भोक्ता... पण या पुस्तकाच्या वेगाने मलाही भोवळ आली. हेही पुस्तक छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील आहे... कथेतील वेगाबरोबरच..यातील रहस्य- ही अखेरपर्यंत टिकवून ठेवण्यात लेखक यशस्वी झाला आहे. शेवटच्या टप्प्यात कथेला जी कलाटणी दिली आहे ना... त्यामुळे वाचक तीनताड उडतो. वाचनीय पुस्तक आहे. अवश्य वाचा...आणि हो...पुस्तक विकत घेऊन वाचा.... थोडक्यात काय... तर पै. मानुगडे यांनी या 'पुस्तकडावा'ने वाचकांना चारी मुंड्या चित केले.

– सुधीर कुलकर्णी

## शांताराम




अभिनय व लेखनाची आवड, प्रथमोपचारा- चे ज्ञान आणि सामान्य लोकांच्या भलेपणावर विश्वास असणारा हा तरुण. प्रस्थापित सत्तेविरुद्ध उठाव करता करता वाईट संगतीमुळे ड्रगच्या नशेचा बळी, त्यामुळे बँका लुटायचे सत्र , घटस्फोट व शेवट तुरुंगात; पण नंतर हा ऑस्ट्रेलियामधून तुरुंग फोडून फरार होतो व बनावट पासपोर्टवर १९८२मध्ये भारतात प्रवेश करतो. मुंबईमध्ये काही दिवस सामान्य हॉटेलमध्ये राहिल्यावर मराठी मित्राबरोबर जळगावच्या जवळ

मित्राच्या गावात सहा महिने मुक्काम. या दिवसांत मराठीवर शिव्यांच्या बारकाव्यासहित प्रभुत्व. इथेच मित्राची आई त्याचे 'शांताराम' असे बारसे करते. गावाकडून परतल्यावर कुलाब्याच्या झोपडपट्टीत मुक्काम; कारण बरोबर आणलेला पैसा खतम. तिथे याच्या लिंडसे या नकली नावाचे 'लिन बाबा' असे नामकरण त्याचा मित्र करतो. विदेशी नागरिकांना currency बदलून देणे, गांजा, हशीश पुरवणे असे उद्योग करून गुजराण करू लागतो. याही दिवसांत झोपडपट्टीत प्राथमिक वैद्यकीय सेवेकरता दवाखाना चालवतो आणि तेथील स्थानिक लोकांच्या जीवनाशी सर्वार्थाने एकरूप होऊन जीवनाचा आनंद घेत असतो. या माणसाने मुंबईतीलफोर्ट भागातील गल्ली न् गल्ली पायाखालून घातली. लिओपोल्ड या इराणी कॅफे/बारमध्ये तास न् तास विदेशी मित्रांबरोबर पडीक. मुंबईतील गुन्हेगारी, त्यामध्ये इराणी, अफगाणी, लेबानिस, पाकिस्तानी आणि नायजेरिअन टोळ्यांचा सहभाग. विदेशी चलन, बनावट पासपोर्ट / व्हिसा, ड्रग रॅकेट आणि वेश्याव्यवसाय या सर्व गैरधंद्यांची सखोल माहिती. या सर्व गोष्टी वाचून आपण चकित होऊन जातो. आपल्याला मुंबईच्या गुन्हेगारी विश्वाचे नागडे दर्शन होते. यानंतर त्याचे प्रेमप्रकरण आणि मैत्रिणीकरता कुंटणखान्याच्या मॅडमबरोबर पंगा घेतल्यामुळे हा हकनाक आर्थर रोडच्या जेलमध्ये पिचत पडतो. जेलमधले त्याचे अनुभव वाचून अंगावर अक्षरशः शहारे येतात. local डॉन पैसे देऊन याची सुटका करवतो. नंतर हा त्या डॉनसाठी foreign currency आणि बनावट पासपोर्टच्या धंद्यात काम करू लागतो. आता पैसा त्याच्या पायाशी लोळत असतो. या पुस्तकात जागोजागी जीवन, मित्र, प्रेम आणि ईश्वराविषयीचे तत्त्वज्ञान, भारतीय लोकांची जगण्यातल्या साध्या साध्या गोष्टींचा आनंद घ्यायची वृत्ती आणि मुंबईतील झोपडपट्टीमधील दादागिरी ते आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी अशा वेगवेगळ्या गोष्टी हातात हात घालून वावरत आहेत. कौतुक याचे वाटते की हा विदेशी माणूस झोपडपट्टी किंवा भारतातली गरिबी याची तक्रार करत नाही, तर येथील लोकांच्या जिंदादिलीमुळे, आयुष्य जगणं कसं सोपं होतं ते सांगतो. भारतीय लोक दिवसभर हिंदी गाणी गात, चित्रपट बघत, वेगवेगळे सण साजरे करत जीवनाचा उत्सव करतात, असे त्याला वाटते. आजही मुंबईला तो आपले Home town मानतो. शेवटी तो डॉनच्या आग्रहामुळे अफगाणिस्तानमध्ये तेथील युद्धात भाग घेण्यास जातो.

हा सर्व भाग अविश्वसनीय आहे. शेवटी ही एक कादंबरी आहे; पण यातील बराचसा भाग लेखकाने अनुभवला आहे. आपल्याच मुंबईची आणि तेथल्या रगेल आणि रंगेल जनतेची ग्रेग आपल्याला वेगळीच ओळख करून देतो. आणि सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे... मराठीवर प्रेम करणाऱ्या ग्रेगने मराठीत अनुवाद केलेली प्रकरणं ऐकून हे भाषांतर आतापर्यंतचे सर्वोत्कृष्ट भाषांतर आहे, अशी अपर्णा वेलणकर यांना पावती दिली; कारण ही कादंबरी ३८ भाषांमध्ये translate झाली आहे. अपर्णाताईंचे कौतुक जेवढे करावे तेवढे थोडेच; कारण आपण अस्सल भारतीय गोष्ट वाचतोय असे वाटते.

– नितीन मराठे

## स्वामी





पानिपतच्या भीषण हानीनंतर नानासाहेब पेशवे देखील गेले आणि अवघ्या सोळाव्या वर्षी माधवराव पेशवे झाले. ‘स्वामी’ने अक्षरशः सर्व रूपं दाखविली. सुरुवातीला काकांमुळे असहाय झालेले, निजामाचा बंदोबस्त करणारे, राक्षसभुवनच्या लढाईत स्वतः सामोरे गेलेले माधवराव, शेवटच्या पानांमध्ये रमा-माधव यांचे नाते. दक्षिणेत निजाम हैदर याचा बंदोबस्त करून पानिपतचे अपयश धुऊन काढत उभ्या हिंदुस्थानावर मराठ्यांचा भगवा डौलाने फडकावणारे माधवराव वाचून अभिमान वाटला. इंग्रजांचे मनसुबे लक्षात ठेवून त्यांनाही दूर ठेवणारे माधवराव. मराठेशाहीचा एक अनमोलहिरा वाचायला मिळाला याचा खूप आनंद झाला. रमा-माधवचे प्रेम तर कमाल आहे. एकमेकांकडे काही न मागणारे दोघे. रमाबाईंना नदीकाठचा सुंदर प्रदेश माधवरावांना दाखवायचा असतो; पण जबाबदारीने जमत नाही. पुस्तकाच्या शेवटी जे वर्णन आहे त्याने गळा दाटून येतो. रमाबाई तो प्रदेश पाहतात; पण माधवरावांच्या चितेवर सती जाताना. रणजित

देसाईंना मनापासून सलाम! पेशवाईतील एका अनमोल हिऱ्याचं तेज पुस्तकरूपाने समोर आणल्याबद्दल.

– प्रशांत गोसावी

## द पिक्चर ऑफ डोरियन ग्रे




ऑस्कर वाइल्ड यांची 'द पिक्चर ऑफ डोरियन ग्रे' ही कांदबरी १८९१ मध्ये प्रसिद्ध झालेली. एका निरागस तरुणाला मिळालेला चिरतारुण्याचा वर, त्या चिरतारुण्यासाठी स्वतःचं केलेलं अंध:पतन, मोह, सैरभैर होणारं मन, वास्तव, कोमलता आणि क्रौर्य, सद्‌सदविवेकबुद्धीचा ऱ्हास, अतिशय नीच पातळीवर जाण्यासाठी मोहात पाडणारं तत्त्वज्ञान. या सगळ्याचं लेखकाच्या शैलीतील चित्रण कांदबरीमध्ये वाचायला मिळते.

– संगीता देशमुख-देशपांडे


## डायरी ऑफ ॲन फ्रँक




'डायरी ऑफ ॲन फ्रँक' आज वाचून झाले. एवढ्या लहान वयात १३व्या वर्षी ती लिहिती झाली ते १५ वर्षांची होईपर्यंत तिने रोजनिशी लिहिली. १६ वर्षांची होण्या-अगोदरच तिचा मृत्यू झाला. तिचे लेखन छान आहे. ती जर जास्त जगली असती तर तिने अजून छान छान पुस्तके लिहिली असती नक्कीच ! मला हे पुस्तक आवडले.

– अलका घाडीगावकर

## साद घालतो कालाहारी




सन १९७४ च्या दरम्यान मार्क आणि डेलिया ओवेन्स हे अमेरिकी दाम्पत्य आपले घर आणि त्यातील वस्तू विकून थोडे पैसे उभे करते. आफ्रिकेतील कालाहरी वाळवंटात वन्यजीवांच्या संशोधनासाठी जातात. सुरुवातीला पैशाचे फार पाठबळ नसताना आपले वन्यजीवांवरील संशोधन सुरू करतात. वाळवंटातील हा एकाकी भूभाग तोपर्यंत मानवी स्पर्शापासून दूर होता. अनंत अडचणी सोसून तेथे सात वर्षे दोघेही राहतात. तेथील सिंह, ब्राऊन हायना यांच्या सामाजिक जीवनाबद्दल खूप वेगळी माहिती त्यांना मिळते. तेथील प्राणीही त्यांना आपले मानतात. सिंह, ब्राऊन हायना त्यांच्या अगदी आजूबाजूला वावरत राहतात. पाण्यासाठी हजारोंच्या संख्येने स्थलांतर करणाऱ्या विल्ड बिस्टची कृत्रिम कुंपणाने झालेली परवड त्यांना दिसते. जगासमोर पोटतिडकीने हे सगळं ते मांडतात. दोघं मिळून 'Cry of the Kalahari' हे पुस्तक लिहितात. मंदार गोडबोले यांनी या पुस्तकाचा सहजसुंदर अनुवाद केला आहे. विलक्षण अनुभव देणारं हे पुस्तक आहे.

– विनया जंगले

## चौघीजणी

लुईसा मे अल्कॉट या अमेरिकन लेखिकेच्या ‘लिटल वुईमन’ या पुस्तकाचा शान्ता शेळके यांनी केलेला अनुवाद म्हणजे ‘चौघीजणी.’ मार्च कुटुंबातील मेग, ज्यो, बेथ आणि ॲमी यांच्या आयुष्याभोवती गुंफलेली ही कथा. चौघी बहिणींचा आत्यंतिक स्नेह, माया याने ओतप्रोत असे यांचे नाते, तरीही प्रत्येकीचे स्वप्न, आशा-आकांक्षा वेगवेगळ्या आणि ते साध्य करण्यासाठी असलेली चौघींची धडपड, त्यांची सुखे, त्यांची दुःखे यांचे कधी विनोदी तर कधी हृदयस्पर्शी वाटणारे असे वर्णन. यात असलेला साधेपणा, सच्चेपणा आपल्या मनाला मोहवतो. चौघींचे आपल्या



मातापित्यांशी असलेले नाते इतके सच्चे आहे की आपण त्याने प्रभावित होतो. पैसा हा सुखासीन आयुष्यासाठी जरी आवश्यक असला तरी परस्परांतील प्रेम,जिव्हाळा यावरच नात्याचे खरे सौंदर्य अवलंबून असते, हा मौलिक विचार सहज मनावर बिंबवला जातो, ज्याची खरंतर आज खूप गरज आहे. ज्यो, मेग, बेथ, ॲमी आणि त्यांच्या शेजारी राहणारा त्यांचा बालमित्र लॉरी यांच्यातील प्रेमळ नाते, त्यांच्या मुग्ध शैशवाचे रमणीय चित्र आपणाला या पुस्तकात पाहावयास मिळते. त्याचबरोबर उत्तम, श्रेष्ठ अशा नीतिमूल्यांचे संस्कार अतिशय अलगद हळुवारपणे वाचकांवर होतात, कोठेही बटबटीतपणा अथवा कंटाळवाणेपणा जाणवत नाही. अतिशय हृद्य आणि विलोभनीय असे कुटुंब -चित्र लेखिकेने आपल्यासमोर प्रस्तुत केले आहे आणि शान्ता शेळके यांच्या लेखणीने यावर 'चार चाँद' लावले आहेत. त्यांनी केलेला हा अनुवाद कोठेही रटाळ होत नाही, तर शब्दाशब्दांतून तो अधिक खुलत जातो आणि अखेरपर्यंत आपल्याला गुंतवून ठेवतो.

– अश्विनी जगताप

## काबुलीवाल्याची बंगाली बायको

बंगाली ब्राह्मण कुटुंबातील एका सुशिक्षित मुलीने, सर्वांचा विरोध झुगारून, एका परदेशी मुसलमान तरुणाशी लग्न केलं आणि सासरच्या माणसांना भेटण्यासाठी अफगाणिस्तानातील एका लहानशा गावात ती मोठ्या विश्वासानं गेली; पण तिथं गेल्यावर तिच्या लक्षात आलं की या देशात येण्यासाठी रस्ता आहे; पण जाण्यासाठी नाही. तिथली सगळीच माणसं वाईट नव्हती; पण काही लबाड, स्वार्थी माणसांमुळे तिला तिथे बंदी होऊन राहावं लागलं. आठ वर्षांच्या या बंदिवासात तिला आलेले भलेबुरे अनुभव,

तिथले साकळलेले जीवन आणि तालिबान्यांसारख्या धर्मांधांना निकराचा विरोध करून भारतात पळून येताना सोसावा लागलेला भयंकर थरार याची ही कहाणी. तिच्या जीवनाची ही करुण कहाणी वाचताना आपणही गोठून जातो.

– समीर चव्हाण




## झोंबी




कालच 'झोंबी' वाचून संपवलं... पण मनात रेंगाळत राहिलंय... वाचत असतानाही बऱ्याच वेळा वाचन थांबवत होते... आनंद यादव प्रथमच वाचले... त्यांच्या जिवंत अनुभवांनी त्यांच्यापेक्षा माझेच मन कुचंबून जात होते...१९३४ ते १९५५चा काळ आहे यात; पण असे वाटते की कुठेतरी आपणच जबाबदार त्यांच्या (आणि त्यांच्यासारख्या इतर मुलांच्या / शेतकरी कुटुंबाच्या) हालअपेष्टांना ... कुठे तो काळ आणि कुठे आजची पिढी...उशिरा येण्यावरून, फी वेळेत भरता येत नाही म्हणून.. गरज नसलेल्या मुलांना फ्रीशिप दिल्यामुळे त्यांना कसे हायस्कूलला फ्रीशिपला मुकावे लागते... पुस्तकांची व फीची बेगमी करताना किती हालसोसावे लागतात... किती आणि कुठे राबावे लागते.. हे ते कुठेही वाचकांकडून सहानुभूतीची अपेक्षा न बाळगता... कुठेही लेखणी न अडता ('पुलं'नी प्रस्तावनेत लिहिलेलं 'माझ्या विचारांत, शब्दांत पकडतानाही आले असते.. असे सत्य) कथन करत

जातात... एवढे हाल.. घरात भावंडांच्या वाढत्या लेंढरांना बाप कसा जबाबदार... तरीही शाळेला जाऊ नये म्हणून त्याचा बेदम मार खात... या भल्या माणसाने कसे घरातल्या परिस्थितीची जबाबदारी घेत शिक्षण पूर्ण केले...आपली अभ्यासाची आणि वाचनाची, काव्यलेखनाची आवड कशी जोपासतात... जुनी मॅट्रिक हायस्कूलात तिसऱ्या नंबरने कसे पास होतात.... सारेच डोक्यात घोळत राहते... त्यांच्या आत्मचरित्राचे उर्वरित तीन भागही वाचायचे आहेत... Hats of to you Dr. Anand Yadav.. शत शत प्रणाम तुम्हाला!

– रागिणी बागवे

## कर्मयोगिनी अहिल्याबाई होळकर




अहिल्याबाई होळकर यांची ‘पुण्यश्लोक’ ही ओळख सर्वश्रुत आहे आणि अनेकांनी ती अधोरेखित केली आहे. त्याला अनेक कारणे आहेत, जसे त्यांचा श्रद्धाळू स्वभाव, त्यांनी केलेला बऱ्याच मंदिरांचा जीर्णोद्धार, त्यांनी केलेला दानधर्म आणि इतर बरेच काही; पण लेखिकेने या पुस्तकात त्यांच्या पुण्यश्लोक या प्रतिमेबरोबरच त्या कशा कर्मयोगिनी होत्या हेही उत्तमरीत्या सांगितले आहे. त्यांचा मुत्सद्दी स्वभाव, फडणिशीत केलेले अतुल्य काम, राज्यकारभारी गुण, त्यांची न्यायदानी वृत्ती, राजपूत चंद्रावतांचा केलेला बीमोड, राघोबादादांना युद्ध न करताच घ्यायला लावलेली माघार, आप्तस्वकीय इहलोक सोडून जातानाही दाखवलेला खंबीरपणा, अशा अनेक सद्गुणांचे दर्शन यात घडते. पुस्तक दोन भागांत विभागले आहे. पहिल्या भागात त्यांचे बालपण, सासरकडचे सुरुवातीचे दिवस, सासरे मल्हाररावांकडून घेतलेले राजकारणाचे धडे, सासवांबरोबरची जवळीक, पती

खंडेरावाकडून झालेला त्रास, स्वतःच्या पोटच्या लेकरामुळे आलेली हतबलता लेखिकेने खूप उत्कृष्टरीत्या रंगवली आहे. दुसऱ्या भागात त्यांच्या जीवनाचा उत्तरार्ध चित्रित केला आहे, ज्यात सुभेदार तुकोजीबरोबरचे सुरुवातीला असलेले चांगले आणि नंतर बिनसलेले संबंध, दुसरे मल्हारराव , रखमाबाई, नारो गणेश, बापू होळकर आदींशी आलेले संबंध, त्यांनी केलेले राजकारण, महादजी शिंदेंसोबत भावासारखे संबंध असूनही शिंदे आणि होळकर यात भांडणे होत असताना आलेली विवशता ते त्यांचा इहलोकीपर्यंतचा प्रवास छान मांडला आहे. अहिल्याबाईंनी त्यांच्या जीवनकाळात बरेच मृत्यू पाहिले. त्यांची सख्खी सासू , सासरे, सती गेलेल्या सावत्र सासवा, नवरा, सती गेलेल्या सवती, मुलगा मालेराव, सती गेलेल्या सुना, नातू नथोबा, सती गेलेल्या नातसुना, जावई यशवंतराव, सती गेलेली स्वतःची मुलगी मुक्ता आणि बरेच आप्तस्वकीय त्यांना सोडून गेले. अहिल्याबाई सासरे मल्हाररावांच्या विनंतीमुळे सती गेल्या नाहीत; पण इतर लोकांकरवी त्यामुळे लागलेले बोल, तसेच त्यांचे सती आणि तत्सम रूढी-परंपरेवरचे विचार लेखिकेने सुंदररीत्या मांडले आहेत. अहिल्याबाईंच्या जीवनकाळात बरेच पेशवे होऊन गेले. थोरले बाजीराव ज्यांनी छोट्या अहिल्येमुळे प्रभावित होऊन मल्हाररावांना तिला सून करायला सांगितले त्यांपासून ते नानासाहेब, थोरले माधवराव, नारायणराव, रघुनाथराव आणि सवाई माधवरावांपर्यंत त्यांचे सर्वांशी कडू-गोड संबंध राहिले. पेशवाईतल्या घडामोडी अहिल्येला सुरुवातीला मल्हाररावांकडून, नंतर तुकोजी- कडून आणि इतर हेरांकडून खलित्यामार्फत समजताना अहिल्याबाईंची त्यावरील वैयक्तिक मते आणि विचार मात्र वाचकांना कळत राहतात. अहिल्याबाईंनी जीवनात स्वकीयांबरोबर खूप झुंज दिली; पण त्यांना बदलण्यात वा सुधारण्यात त्या सपशेल अपयशी ठरल्या, जसे पती खंडेराव, मुलगा मालेराव, दुसरे सुभेदार तुकोजी, दुसरे मल्हारराव आणि इतर. त्या काळच्या मुस्लीम राज्यकर्त्यांनी केलेली मंदिरे आणि इतर धार्मिक स्थळांची नासधूस आणि या अवहेलनेने हिंदू सैनिक आणि लोकांमध्ये आलेली हतबलता रोखण्यासाठी सर्व प्रमुख धार्मिक स्थळांचा जीर्णोद्धार करून त्यांना पुनःप्रेरित करणे, यातून अहिल्याबाईंची दूरदृष्टी दिसते. लेखिकेने पुस्तकात जुनी (१८व्या शतकातली मराठी) भाषा वापरली आहे. त्यामुळे अहिल्याबाईंचे आणि इतर पात्रांचे संवाद हे खरे खरे वाटतात. जुन्या मराठी भाषेचा साज

चढवून लेखिकेने या पुस्तकाला एका वेगळ्या उंचीवर नेले आहे. त्यामुळे हे चरित्र फक्त ऐतिहासिक कादंबरी न राहता अभ्यासपूर्ण इतिहासलेखन झाले आहे. या पुस्तकावर दोन जणांनी M. Phil. केले हे समजल्यावर आश्चर्य वाटायला नको. एकंदरीत ऐतिहासिक कादंबरी आवडणाऱ्यांबरोबर मराठी इतिहास संशोधक, तसेच विद्यार्थी यांनी आवर्जून वाचावे, असे हे पुस्तक आहे.

- आकाश बळवंते

## नाइट




ज्यूंचा जो छळ क्रूर हिटलरने केला, त्याचे हृदयस्पर्शी वर्णन या पुस्तकात एली वायझलयांनी केले आहे. माणूस किती अमानुषपणे दुसऱ्याशी वागू शकतो, हे वाचून अंगावर शहारे येतात. या छळछावणीत लेखकाच्या डोळ्यांसमोर त्याच्या पूर्ण परिवाराचा अतिशय करुण अंत झाला. केवळ पंधराव्या वर्षी कोणालाही भोगाव्या लागू नयेत अशा यातना त्यांनी भोगल्या. हजारो, लाखो ज्यू बांधवांना क्रूरतेने मरणाच्या खाईत लोटणाऱ्या निर्दयी नाझींचे वास्तववादी चित्रण लेखकाने या पुस्तकात यशस्वीपणे केले आहे. पुस्तकातील काही प्रसंग अतिशय करुणार्द्र असून, मनाला हादरा देणारे आहेत. लेखकाने अनेक काळरात्री अनुभवल्या आणि त्या त्यांच्या संपूर्ण आयुष्याला कलाटणी देऊन गेल्या. त्यांचे हे अनुभव नाझींची मानवतेला काळिमा फासणारी वृत्ती अधोरेखित करतात. अशा छळछावण्यांमधून हालअपेष्टा भोगून सुटलेल्या सर्व योद्ध्यांना सलाम....

- अनिरुद्ध देवकर

अद्‍भुत कल्पनाविहारातून
जादुई विश्वाची सफर घडवणाऱ्या
अफलातून कादंबऱ्यांची मालिका
The Time Quintet प्रथमच मराठीत...




- **कालपटलावरील सुरकुती**
- **दारातील वादळ**
- **वेगाने कलणारा ग्रह**
- **अमाप पाणी**
- **अनुकूल काळ**




मूळ लेखक

# मॅडेलिन लेंगल

अनुवाद

**मुग्धा गोखले**












'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
No. CSO/Pune City/SR/3/2021 - Date : 10/01/2021
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 09/05/2021 Posting Date : 11/05/2021


# नवीन संहिता... नवा आशय...














**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,